
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : का.वा
दा. क्र. २५२२



BVBK-0402522

शान्ता ज. शेळके

म. गं. नं. हार्डे, ग्रंथालय ठाणा.
[illegible]
क्र. २४२२ दिनांक १८/५/६१
विषय भाषा

# सागरिका

शान्ता ज. शेळके

BVBK-0402522

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४

प्रकाशक
सौ. सविता सु. जोशी
रेणुका अपार्टमेंट
पुणे ४११ ००४

* *

© सर्वाधिकार सुरक्षित

* *

प्रथमावृत्ती
१४ नोव्हेंबर १९९०
शके १९१२

* *

मुद्रक
सौ. कमल रामचंद्र बळसारी
संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

* *

किंमत
बारा रुपये

## आधी थोडेसे—

लहान मुलांसाठी कथा आणि कविता लिहिणे हा माझा अगदी प्रारंभापासूनचा आवडीचा छंद आहे. मला आठवते, माझ्या लेखनाच्या सुरुवातीच्या काळात मी लिहिलेले ' निळा दिवा ' हे पुस्तक बालकथांचेच होते. त्याच सुमाराला, थोडे आगेमागे मी ' चिमणचारा ' आणि ' थुईथुई नाच मोरा ' हे दोन बालगीतांचे संग्रहही लिहून प्रकाशित केले होते. बालपणापासून मला साहित्यातील अद्‌भुताचे विलक्षण आकर्षण वाटत आले आहे. लहान मुलांसाठी कथा-कविता लिहिताना माझ्या या विशिष्ट अभिरुचीची तृप्ती होत असावी. आजही पूर्वीइतक्याच हौसेने आणि उत्सुकतेने मी लहान मुलांसाठी साहित्य लिहिण्यात रमून जाते.

प्रस्तुत पुस्तकात काही बालकथांचा समावेश केलेला आहे. या कथा मी कित्येक वर्षांपासून लिहीत आले आहे. हॅन्स ॲण्डरसन आणि ग्रिम बंधू हे जगद्विख्यात बालसाहित्यकार सोडले तरी प्रत्येक देशाच्या, समाजाच्या खास त्याच्या म्हणून काही कथा परंपरेने चालत आलेल्या असतात. त्या मी फार आवडीने वाचल्या आहेत. चिनी, जपानी, रशियन, आफ्रिकन अशा किती तरी देशांतील बालकथांचे इंग्रजीत सुंदर अनुवाद झालेले आहेत. तर काही कथा आपल्याच देशातल्या, पिढ्यान् पिढ्या लोकांच्या तोंडोतोंडी खेळत आलेल्या अशा आहेत. या अनुवादांतून, श्रवणातून माझ्या मनात झिरपत गेलेल्या कथा मी इथे आपल्या छोट्या बालवाचकांसाठी सादर केल्या आहेत. यांतल्या काही कथा सरळ अनुवाद आहेत. काही कथांमधल्या केवळ मध्यवर्ती कल्पना उचलून त्यावर मी माझी कलाकुसर केली आहे, तर काही कथांमधील व्यक्तींवर मी भारतीय वेष चढवले आहेत. या कथा लिहिताना मी त्यामध्ये खूप रमले होते. एका वेगळ्या अद्‌भुतरम्य वातावरणात विहरत होते. त्यावेळी मला झालेल्या आनंदाचा थोडासा जरी प्रत्यय या कथांमधून माझ्या छोट्या वाचकांना आला तरी मला फार आनंद आणि समाधान वाटेल.

१९ आदर्शनगर,
पुणे–सातारा रोड, पुणे ३७

शान्ता ज. शेळके

अनुक्रमणिका

१. सागरिका
२. लुगड्याचे मोल
३. पांडुरंगाचा तवा
४. भुवईवरचा व्रण
५. पुष्कर आणि शेवंती
६. सयाजीचे पेरू
७. गऱ्हाची लोंबी
८. धनदत्त श्रेष्ठी
९. वनीचे गुपित

म. ग्रं. सं. ... शाखा.
दा. 25722 ... 28/5/6
विषय बा.वा. क्र.

# सागरिका

शेकडो वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. केरळच्या समुद्रकिनाऱ्यावर एक चिमुकले गाव होते. गाव कसले ? खेडेच म्हणायचे. त्या खेड्याचे नाव होते चित्रपल्ली. नारळीपोफळीच्या हिरव्या गर्द रांगांमध्ये विसावलेले चित्रपल्ली खेडे खरोखरच एखाद्या चित्रासारखे सुंदर दिसत असे. जवळच्या पांढऱ्याशुभ्र रेतीच्या किनाऱ्यावर समुद्राच्या लाटा फेसांच्या माळा उधळीत. सांजसकाळ समुद्रावर होणारे सूर्योदय आणि सूर्यास्त लालसोनेरी रंगाची खुलावट दाखवीत. रात्रीच्या वेळी समुद्राची गंभीर गाज ऐकत चित्रपल्ली खेडे आईच्या पदराआड असलेल्या एखाद्या लहान बाळासारखे गाढ झोपून जाई.

चित्रपल्ली हे कोळ्यांचेच गाव होते. तिथली बहुतेक सारी वस्ती कोळ्यांची असे. छोट्या छोट्या खोपटांतून राहणारे हे कोळी मासे मारीत आणि ते आसपासच्या गावांत विकून त्यावर आपले पोट भरीत. या कोळ्यांच्या वस्तीत चिनय्या नावाचा एक पोरगेलासा कोळी होता. त्याच्या घरी त्याच्या म्हाताऱ्या दुबळ्या आईवडिलांखेरीज आणखी कुणी नव्हते. आपले लहानगे होडगे आणि जाळे घेऊन चिनय्या रोज समुद्रावर जाई. जाळे पाण्यात टाकून तो मासे पकडी. हे मासे विकून तो आपले आणि आपल्या आईवडिलांचे पोट भरी. काळा कुळकुळीत, रेखीव स्नायूंचा आणि पातळ सडसडीत बांध्याचा चिनय्या एखाद्या घोटीव मूर्तीसारखा सुबक, सुंदर दिसे. त्याचे दात पांढरेशुभ्र होते.

डोळे टपोरे आणि हसरे होते. ओठ नेहमी बोलायला आतुर असे दिसत. चिनय्या हसला की त्याच्या गालांना नखांएवढ्या चिमुकल्या खळया पडत. आणि चिनय्या हसतही असे एकसारखा. एकूण तो मोठा आनंदी होता. गाणे गुणगुणत मासे पकडताना तो अगदी भान विसरून जाई.

असाच एके दिवशी चिनय्या आपले होडगे घेऊन रोजच्यासारखा समुद्रावर मासे पकडायला गेला. आधी त्याने पाण्यात जाळे टाकले. पण आज काय झाले होते कुणास ठाऊक! चिनय्याने पाण्यात एकदा, दोनदा, तीनदा जाळे फेकले पण त्याला एकही मासा मिळाला नाही. चौथ्या खेपेला चिनय्याने पाण्यात जाळे टाकले, त्यावेळी मात्र त्याला ते जरासे जड लागले. मोठ्या उत्सुकतेने चिनय्याने ते वर ओढले. बघतो तो काय? जाळ्यात एक खूप म्हातारे, भले मोठे कासव होते. चिनय्याने कासव जाळयाबाहेर काढले. पाठीवरच्या कवचातून आपले डोके वर काढून कासव केविलवाण्या डोळ्यांनी चिनय्याकडे बघू लागले. चिनय्याला कासवाची दया आली. त्याने ते कासव हलकेच आपल्या हातांत धरले आणि पुन्हा अलगद पाण्यात सोडून दिले. पाण्यात पडताच आपले चारी पाय तुरुतुरु हलवीत कासव एकदम समुद्राच्या तळाशी निघून गेले. बघता बघता दिसेनासे झाले.

चिनय्या विमनस्कपणे समुद्राकडे बघत राहिला. आज त्याला काहीच मिळाले नव्हते. त्याला फार वाईट वाटले. आता सूर्य बराच वर आला होता. उन्हात समुद्राच्या लाटा चमचमत होत्या. वारा पडला होता. सर्वत्र विलक्षण शांतता पसरली होती. चिनय्या संथपणे होडग्यात हेलकावत होता. जरा वेळाने त्याचे डोळे पेंगू लागले. त्याला झोप आली. समुद्रावर तरंगणाऱ्या आपल्या होडग्यात तो निवांतपणे झोपी गेला.

इतक्यात एक विलक्षण चमत्कार घडला. समुद्राच्या पाण्यातून एक अतिशय सुंदर मुलगी वर आली. तिच्या अंगावर जांभळयानिळ्या रंगाची झग-मगती रेशमी वस्त्रे होती. गळयात, हातांत मोत्यांपोवळ्यांचे अलंकार होते. तिचे काळेभोर लांब केस मोकळया वाऱ्यावर भुरूभुरू उडत होते. तिच्या डोळ्यांत समुद्राच्या लाटांचा अथांगपणा आणि सूर्यकिरणांची चमक होती. डौलाने पाण्यावरून तरंगत, वाऱ्याच्या झुळकेसारखी हळुवार तरळत ती चिनय्याच्या होडक्यापाशी आली. होडीत शांतपणे झोपी गेलेल्या चिनय्याकडे बघत ती



क्षणभर स्तब्ध राहिली. मग तिने हलकेच त्याच्या गालाला हात लावला. चिनय्या एकदम झोपेतून जागा झाला. समोर उभ्या असलेल्या त्या सुंदर मुलीकडे तो विस्मयाने बघतच राहिला. त्यावर ती मुलगी प्रेमळपणे हसून म्हणाली,

"माझ्याकडे असा नवलाने बघू नकोस. मी समुद्रराजाची लाडकी लेक आहे. माझं नाव आहे सागरिका. माझ्या वडिलांनी मला मुद्दाम तुझ्याकडे पाठवलं. तू आज ज्या कासवाला जीवदान दिलंस ना, ते माझ्या वडिलांचं आवडतं पाळीव कासव आहे. त्याला तू वाचवलंस म्हणून माझे वडील तुझ्यावर प्रसन्न झाले आहेत. तुला घेऊन यायला त्यांनी मला आज्ञा दिली म्हणून मी इथं आले आहे. या समुद्रात दूर दूर अंतरावर एक छोटंसं बेट आहे. तिथं आमचा सुंदर राजवाडा आहे. या बेटावर बाराही महिने वसंतऋतु बहरलेला असतो. झाडांवेलींवर सतत सुगंधी फुले उमलतात. चल माझ्याबरोबर. माझे वडील तुला जावई करून घेणार आहेत. मलाही तू भारी आवडला आहेस. चल ना चिनय्या! आपण आमच्या बेटावर जाऊ आणि तिथं कायम सुखानं संसार करू."

आपण जागे आहोत की स्वप्नात आहोत हेच चिनय्याला कळेना. तो डोळे भरून सागरिकेकडे बघू लागला. जो जो बघावे तो तो ती त्याला अधिकच आवडू लागली. तिचे सुंदर रूप बघून तो मोहून गेला. तसाच तिच्या गोड शब्दांनी तो भारावून गेला. सागरिका पटकन त्याच्या शेजारी होडीत येऊन बसली. तिने एक वल्हे हातात घेतले. चिनय्याने दुसरे वल्हे हातात घेतले आणि ती दोघे मिळून ते चिमुकले होडगे वल्हवू लागली. बघता बघता दिवस मावळला. संध्याकाळ झाली. लाल सोनेरी किरणांत लाटा झगमगू लागल्या. समुद्राच्या पाण्यावर वल्हवीत वल्हवीत सागरिकेने होडगे दक्षिणेकडे वळवले. जरा वेळाने समुद्रात एक बेट दिसू लागले. होडगे किनाऱ्यापाशी येऊन पोहोचले. ते सुंदर बेट बघून चिनय्याचे डोळे दिपून गेले. सर्वत्र फुलांनी बहरलेली वने होती. आणि मध्यभागी गर्द निळया संगमरवराचा अत्यंत सुरेख राजवाडा उभा होता. समुद्रराजाचा राजवाडा होता तो. चिनय्याने आणि सागरिकेने बेटावर पाऊल ठेवताच लाल, निळया, केशरी, नारिंगी पोषाखांतले अनेक सेवक धावतच तिथे आले आणि त्यांनी समुद्रराजाच्या भावी जावयाचे थाटाने स्वागत केले.

नंतर लौकरच त्या बेटावर थाटाचा विवाहसोहळा पार पडला. चिनय्या आता समुद्रराजाचा जावई बनला. लग्नसोहळा बरेच दिवस चालला होता. नाचगाणी, करमणुकीचे कार्यक्रम, मेजवान्या–कशाला म्हणून कमतरता नव्हती. राजाने चिनय्याला सुंदर पोषाख दिले. मूल्यवान अलंकार दिले. बेटावरील सर्व नागरिकांनी नवरानवरीचे खूप कौतुक केले.

चिनय्याच्या सुखाला आता पारावार राहिला नाही. सागरिकेच्या संगतीत तो आनंदात दिवस कंठू लागला. रोज नवी करमणूक, रोज नवी मेजवानी. समुद्राच्या तळाशी असलेली बहुमोल रत्ने, पोवळी, चित्रविचित्र शंखशिंपले यांनी चिनय्याचा महाल सजला होता. बारा महिने वसंतऋतू असलेल्या त्या बेटावर दररोज सुखाचे नवे क्षण फुलत, उमलत होते.

बघता बघता तीन वर्षे उलटून गेली.

या काळात चिनय्यामध्ये एक बदल होत होता. सागरिकेच्या सहवासातही कधी तरी तो एकदम उदास होई. त्याला मधूनच आपले चित्रपल्ली खेडे आठवे. तिथले दोस्त आठवत. आपले लहानसे होडगे आणि त्याच्या साहाय्याने

केलेली मासेमारी आठवे. म्हाताऱ्या आईबापांच्या आठवणीने तर तो फारच उदास होई. सरते शेवटी एके दिवशी तो सागरिकेला म्हणाला,

" राणी, मला माझ्या घराची फार आठवण येते. मी एकदा घरी जातो. माझ्या म्हाताऱ्या आईबापांना भेटतो. आणि लगेच पुन्हा तुझ्याकडे परत येतो. मग ? जाऊ मी ? सांग. जाऊ का ? "

चिनय्याचे बोलणे ऐकून सागरिकेचे डोळे आसवांनी भरून आले. बराच वेळ ती मुकाट्याने रडत राहिली. मग ती म्हणाली,

" ठीक आहे. तुम्हाला जाऊन यायचे आहे तर या जाऊन ! तुमच्या इच्छेच्या आड मी येणे बरे नव्हे. पण का कोण जाणे ? माझे काळीज कसे धडधडू लागले आहे. मनात येते, एकदा तुम्ही गेलात की पुन्हा आपली भेट व्हायची नाही. पण तरीदेखील मी तुम्हाला एक छोटीशी पेटी देते. ही पेटी जोवर बंद असेल तोवरच तुम्ही तुमच्या इच्छेनुसार परत येऊ शकाल. मात्र ध्यानात ठेवा. एकदा का ही पेटी तुम्ही उघडलीत तर मग तुमचा इकडे परत येण्याचा मार्ग कायमचा बंद झाला म्हणून समजा ! तेव्हा कृपा करून ही पेटी मात्र कधीही उघडू नका. "

आणि सागरिकेने एक छोटीशी पेटी चिनय्याला दिली. ती पेटी लाकडाची होती. तिच्यावर सुंदर नक्षीकाम केलेले होते. आणि एका लाल रेशमी गोफाने ती बंद केलेली होती. चिनय्याने पेटी हातात घेतली. सागरिकेचे डोळे पुसून त्याने तिचे सांत्वन केले. पेटी कधीही न उघडण्याची त्याने तिच्यापाशी शपथ घेतली आणि आपल्या लाडक्या राणीचा निरोप घेऊन तो परत घरी यावयास निघाला.

एका संध्याकाळी समुद्रावरून लाटेसारखा तरंगत तरंगत चिनय्या निघाला तो तसाच तरंगत तरंगत समुद्रकिनाऱ्याजवळ आला. समोर चित्रपल्ली गावाच्या खुणा त्याला दिसू लागल्या, मोठ्या आनंदाने, उत्सुकतेने चिनय्याने किनाऱ्यावर पाऊल ठेवले. आणि मऊ मऊ रेती तुडवीत तो झपाट्याने गावात येऊन पोहोचला.

गाव बघून मात्र चिनय्या बुचकळ्यात पडला. ते चित्रपल्ली गावच होते. पण तरीही ते जुने खेडे आता राहिले नव्हते. चिनय्या राहत असे त्या झोपडीचा कुठे मागमूसही उरलेला नव्हता. घरांचे आकार पालटले होते.

नारळी पोकळीच्या झाडांच्या रांगा बदलल्या होत्या. झाडे, रस्ते, मधली मोकळी मैदाने, इतकेच नव्हे तर तिथे वावरणाऱ्या लोकांचे चेहरे सुद्धा कसे वेगळेच दिसत होते. चिनय्याच्या ओळखीचे काहीच आता चित्रपल्लीत उरले नव्हते. साऱ्या जुन्या खुणा पार पुसून गेल्या होत्या. नाही म्हणायला वेशीवरचे देवीचे देऊळ मात्र आपल्या जागेवर उभे होते. तसेच गावाच्या मागल्या बाजूच्या टेकड्यांचे दृश्यही त्याला पूर्वीसारखेच दिसत होते. बाकी सारे पार बदलून गेले होते.

चिनय्या स्वतःशीच विचार करीत त्या रस्त्याने चालू लागला. गावातले कोळी त्याच्याकडे नवलाने, कुतूहलाने बघत होते. चिनय्याला तर त्यांतला एकही चेहरा पूर्वी कधी बघितल्याचे आठवेना. हा काय प्रकार आहे तेच त्याला कळेना. एका विचित्र शंकेने तो कासावीस झाला.

एवढ्यात चिनय्याला एक म्हातारा कोळी समोरून येताना दिसला. तो इतका जख्ख होता की काठी टेकीत मोठ्या कष्टाने तो रस्त्याने चालला होता. चिनय्याने त्याला थांबवले आणि विचारले,

" कोळीदादा, इथे एक चिनय्या म्हणून कोळी राहायचा पूर्वी. त्याचं घर कुठे गेलं हो ? कुणी माणसंही दिसत नाहीत त्याची. काही माहीत आहे तुम्हाला ? "

" चिनय्या ? चिनय्या ? " म्हाताऱ्या कोळ्याने डोळे बारीक करून, कपाळाला आठ्या घालून ते नाव स्वतःशीच दोनदा तीनदा घोळवले. मग एकदम आश्चर्याने तो म्हणाला,

" चिनय्या ? हां हां ! चिनय्या ! आता आठवलं सारं. पण अरे बाबा, तू काही कुणी परक्या गावातून पाहुणा आला आहेस की काय इथे ? तुला माहीत नाही ? अरे, फार फार जुनी कथा आहे. जुनी म्हणजे तीनशे वर्षांपूर्वीची. तेव्हा या चित्रपल्ली गावात चिनय्या नावाचा एक कोळी राहात असे खरा. पण तो एकदा समुद्रावर मासे मारायसा गेला तो तिकडून परत आलाच नाही. तो बहुधा समुद्रात बुडून मेला असावा. तो गेल्यावर त्याचे आईवडील वर्षभरातच त्याच्या दुःखाने मरून गेले. आता मागं उरलंय कोण ? घराचा निर्वंश झाला पार ! ते घर देखील मोडून तोडून मातीला मिळून गेलं. आता तुला त्या घरातल्या लोकांच्या काही खुणा बघायच्याच असतील तर गावच्या स्मशानभूमीत

जा आणि बघ. तिथे चिनय्याच्या नावाचाही एक दगड बसवलाय. अन् त्याच्या आईवडिलांच्या समाध्याही तिथेच आहेत. बघ जा बाबा!"

म्हातारा कोळी काठी टेकीत पुढे निघून गेला. चिनय्या पाषाणाच्या पुतळ्यासारखा जागच्या जागी खिळून राहिला. मग मंद पावले टाकीत तो गावालगतच्या स्मशानात गेला. तिथे गावातल्या किती तरी कोळ्यांच्या नावाने समाध्या बांधल्या होत्या. काही भंगल्या होत्या. काहींचे चिरे निखळले होते. फटींतून गवत वाढले होते. काही दगडांवर शेवाळ चढून ते वाळून गेले होते. सारा देखावा खिन्न, उदासवाणा दिसत होता. एका दगडावर चिनय्याने आपले स्वतःचे नाव वाचले. काही दगडांवर त्याच्या मित्रांची नावे होती. त्याच्या आईचे आणि वडिलांचे नावही त्याला तिथे दिसले. ती नावेदेखील इतकी झिजून गेली होती की ती वाचणे कष्टाचेच काम होते.

चिनय्याच्या आता ध्यानात आले की तो एका विलक्षण अवस्थेचा बळी ठरला होता. तीनशे वर्षांचा काळ लोटून गेला होता. सागरिकेच्या सहवासातली तीन वर्षे माणसांच्या जगातली तीनशे वर्षे होती!

चिनय्या समुद्रकिनाऱ्यावर आला. सागरिकेने त्याला दिलेली पेटी अजूनही त्याच्या हातात होती. ती उघडण्याचा विचारही त्याच्या मनात आला नव्हता. पण आता मात्र त्याला राहावेना. हा सारा प्रकार तरी काय होता? हा चमत्कार घडला तरी कसा? त्या पेटीत तर त्याचे उत्तर दडलेले नसेल? हो. तसेच असावे. चिनय्याच्या मनात अनेक शंका उभ्या राहिल्या. त्या शंकांनी त्या मनातल्या सागरिकेच्या प्रेमावर मात केली. थरथरत्या हाताने त्याने लाल गोफाची गाठ सोडली. पेटीचे झाकण उघडले—

त्याबरोबर त्या पेटीतून शुभ्र धुक्याचा एक लोळ उसळला. तो समुद्राच्या दिशेला वळला. आणि बघता बघता विरून गेला. चिनय्याच्या हातात नुसती रिकामी पेटी उरली. तिच्यात काही नव्हते. काहीसुद्धा नव्हते!

आता चिनय्याला सगळे उमगले. त्याने आपल्या हाताने आपल्या सुखाचा नाश करून घेतला होता. आपल्या लाडक्या राणीकडे पुन्हा जाण्याचा मार्ग त्याने आपल्या हातानेच नाहीसा करून टाकला होता. आता पुन्हा केव्हाही त्याला सागरिकेचे दर्शन घडणार नव्हते!

चिनय्याने भयंकर दुःखाने किंकाळी फोडली. तो धाडकन किनाऱ्यावरच्या

रेतीत पालथा पडला. दोन्ही हातांनी आपले तोंड झाकून घेऊन तो ढसढसा रडू लागला. पण हे त्याचे दुःख क्षणभरच टिकले. दुसऱ्याच क्षणी त्याच्या काळजातून विजेसारखी वेदना सळकली. त्याचे दात खळखळा निखळून पडले. त्याचा चेहरा सुरकुतून गेला, त्याचे केस क्षणार्धात हिमशुभ्र झाले. त्याचे हातपाय मेलेल्या सापासारखे सुकून लोंबू लागले. त्याच्या शरीरातली सारी शक्ती ओहोटी लागलेल्या समुद्राच्या पाण्यासारखी ओसरली. तीनशे वर्षांच्या काळाचे वजन त्याच्यावर अकस्मात कोसळले. आणि त्या असह्य भाराखाली चिरडून, निष्प्राण होऊन चिनय्या त्या रेतीत पडून राहिला. कायमचा.

# लुगड्याचे मोल

श्रावस्ती नगरीत तंतुवीती नावाचा विणकर राहात होता. तो आपल्या कामात फार वाकबगार होता. तंतुवीतीचा स्वतःचा माग होता. त्यावर तो रेशमी, सुती, भरजरी अशी तऱ्हेतऱ्हेची लुगडी विणीत असे. लांबलांबच्या गावांहून व्यापारी खास त्याचा माल खरेदी करण्यासाठी म्हणून येत. तंतुवीती फार लुगडी विणीत नसे. महिन्याकाठी दोन नाही तर तीन लुगडी विणी. पण तेवढ्या मोजक्या लुगड्यांचेही भरपूर मोल त्याला मिळे आणि त्यावर त्याचा संसार सुखाने चाले. श्रावस्तीच्या बाजारपेठेत तंतुवीतीचे छोटेसे दुकान होते. तिथे तो आपली लुगडी विकीत असे.

ललितनारायण हा श्रावस्तीच्या एका श्रीमंत व्यापाऱ्याचा एकुलता एक मुलगा होता. लहानपणापासून तो अतिशय लाडात वाढला होता. त्यामुळे तो पार बिघडून गेला होता. त्याची आई त्याच्या लहानपणीच वारली होती. वडील सतत आपल्या व्यापारउद्योगात, पैसे कमावण्यात गढलेले असत. त्यामुळे ललितनारायणाला कुणी कधी चांगले वळण लावलेच नव्हते. आणि म्हणून तो आळशी, चैनी, उद्धट, उर्मट बनला होता. वडील त्याला भरपूर पैसे खर्चायला देत. ते उधळीत ललितनारायण गावभर भटकत असे. त्याच्या-बरोबर त्याच्या मित्रांचे टोळके असे. ही सर्व मुले उनाडक्या करीत. लोकांना त्रास देत. त्यांच्या खोड्या काढीत. गावाला त्यांनी अगदी वैताग आणला होता.

पण ललितनारायण पडला श्रीमंत बापाचा लाडाकोडाचा मुलगा. त्याला बोलणार कोण ?

एके दिवशी सकाळच्या वेळी असाच ललितनारायण बाजारपेठेत आला. बरोबर त्याचे नेहमीचे दोस्त होतेच. ललितनारायण तंतुवीतीच्या दुकानासमोर येऊन उभा राहिला. समोर लुगड्यांच्या घड्या नीटनेटक्या ठेवून तंतुवीती दुकानात गादीवर बसला होता. ललितनारायणाने एक घडी धसमुसळेपणाने उचलली. ती उलगडीत तो म्हणाला,

" या लुगड्याची किंमत काय ? "

" वीस मोहोरा. " तंतुवीतीने उत्तर दिले.

" वीस मोहोरा ? " ललितनारायण भुवया उंचावीत म्हणाला, " फार वाटते हो किंमत. " बोलतो बोलता त्याने लुगडे उलगडले. ते मधोमध फाडले. आणि अर्ध्या लुगड्याचा तुकडा समोर धरून त्याने विचारले,

' बरे. या अर्ध्या लुगड्याला काय पडेल ? "

आपण इतक्या निगुतीने, कष्टाने आणि प्रेमाने विणलेले लुगडे ललितनारायणाने टर्‌दिशी फाडलेले पाहून तंतुवीतीच्या तळपायाची आग मस्तकाला गेली होती. पण त्याने मोठ्या प्रयासाने आपले मन आवरले आणि शांतपणे उत्तर दिले,

" अर्ध्या लुगड्याला दहा मोहोरा पडतील. "

" खरेच की काय ? " ललितनारायण चेष्टेने म्हणाला, " पण ही किंमतही जास्तच वाटते बुवा ! " त्याने आपल्या दोस्तांकडे बघून डोळे मिचकावले आणि अर्ध्या लुगड्याचे पुन्हा दोन तुकडे केले. त्यांतला एक तंतुवीतीसमोर धरीत तो म्हणाला,

" हां, आता याची किंमत सांगा बरे. "

" याची किंमत पाच मोहोरा ! " तंतुवीतीने पुन्हा शांतपणे उत्तर दिले. ललितनारायणाने लुगड्याचे तुकडे करावेत आणि तंतुवीतीने मनातला संताप आवरून त्या तुकड्याची किंमत सांगावी असा प्रकार बराच वेळ चालला. ललितनारायणाने लुगड्याच्या पार चिंध्या चिंध्या केल्या आणि मग त्यांतली एक बोटभर चिंधी तंतुवीतीसमोर धरून तो म्हणाला,

" याची किंमत ? "

“अर्धी मोहोर.” तंतुवीती म्हणाला.

“हां. ही किंमत ठीक आहे” ललितनारायणाने खोटे खोटे समाधान दाखवीत म्हटले. त्याने अर्धी मोहोर आपल्या खिशातून बाहेर काढली. पण पुन्हा एकदम काही तरी सुचल्यासारखे करून हात झटदिशी मागे घेत तो म्हणाला,

“अरे, पण या येवढ्याशा चिंधीचा काय उपयोग आहे कुणाला? ही घेऊन मी काय करू? छे बुवा! आपल्याला नको तुमचं लुगडं!” आणि चिंधी खाली टाकून तो मोठ्याने हसला. त्याच्याबरोबर त्याचे उनाड मित्रही खदखदा हसत सुटले.

आता मात्र तंतुवीतीला आपला संताप आवरेना. एक तर त्याने विणलेल्या इतक्या सुंदर लुगड्याच्या चिंध्या चिंध्या झाल्या होत्या. त्याचे महिन्याभराचे कष्ट वाया गेले होते. दुसरे म्हणजे त्याचे इतके नुकसान करून ललितनारायण त्याबद्दल एक पैसाही न देता साळसूदपणे तसाच परत चालला होता. तंतुवीती ताडकन उठून उभा राहिला. दुकानांतून रस्त्यावर उडी मारून त्याने ललितनारायणाची मानगूट पकडली आणि तो त्याला म्हणाला,

“चाललास कुठं? आधी या लुगड्याचे पैसे टाक. मग जा हवा तिकडे!”

ललितनारायणाला अजून सगळी चेष्टाच वाटत होती. तो हसत हसत म्हणाला,

“अरे वा! माल मला नको आहे तरी तो तुम्ही माझ्या गळ्यात बांधणार की काय? या चिंध्या घेऊन मी काय करणार?”

“पण सोन्यासारख्या लुगड्याच्या चिंध्या आधी केल्या कुणी? तूच ना?” रागाने थरथरत तंतुवीती ओरडला.

“तुमच्यासमोर तर फाडलं मी लुगडं. मग तेव्हा नाही कुठे तुम्ही तक्रार केली ती?” ललितनारायण गुर्मीने म्हणाला.

बघता बघता त्या दोघांचे जोरदार भांडण पेटले. शेजारपाजारचे सगळे दुकानदार भराभर गोळा झाले. तंतुवीतीबद्दल सर्वांना सहानुभूती वाटत होती. पण ललितनारायणासारख्या गुंडाशी, मवाल्याशी भांडणार कोण? त्या टोळक्याचे प्रताप सर्वांना माहीत होते. भांडण तर खूपच चालले होते. आता काय होणार तेच कुणाला कळेना. इतक्यात रस्त्याने भगवान गौतम बुद्ध

आपल्या शिष्यांसह जाताना दिसले. त्यांना बघताच तंतुवीती धावत त्यांच्याकडे गेला. रस्त्यातच त्यांचे पाय धरून तो काकुळतीने त्यांना म्हणाला,

" भगवान, आपणच न्याय करा. आपण द्याल तो निर्णय मी निमूटपणे मान्य करीन. जरा माझ्या दुकानात चलण्याची तसदी घ्याल तर बरं होईल."

भगवान गौतम बुद्ध किंचित हसले. शांत, प्रसन्न स्मिताने त्यांची मुद्रा उजळली. तंतुवीतीला दोन्ही हातांनी धरून उठवीत ते म्हणाले,

" चल. मी येतो तुझ्या दुकानात. काय झालंय सांग मला."

भगवान गौतम बुद्ध येताच गर्दी दुभंगली. सर्वांनी आदराने त्यांना वाट दिली. भगवान तंतुवीतीच्या दुकानात येऊन बसले. तंतुवीतीने झालेली सर्व हकिकत त्यांना सांगितली. लुगड्याच्या चिंध्या त्यांना दाखवल्या, त्याचे डोळे पाण्याने भरून आले होते. तो म्हणाला,

" महाराज, बघा या दुष्टानं मी विणलेल्या सुंदर लुगड्याची काय दुर्दशा केली आहे ती. आणि आता पैसेही देत नाही म्हणतो!"

गौतम बुद्धांनी आपली शांत मायाळू दृष्टी ललितनारायणाकडे वळवली. ते त्याला म्हणाले,

" तंतुवीती सांगतो ते खरं आहे का सारं?"

भगवानांना पाहून ललितनारायण आधीच मनातून चपापला होता. खोटे बोलायला त्याला तोंडच नव्हते. पण अजून त्याची बेपर्वाई गेली नव्हती. तो गुरगुरून म्हणाला,

" हो. खरं आहे ते. पण त्यात काय मोठंसं? त्याच्या भिकारड्या लुगड्याची सगळीच्या सगळी किंमत मी आता लगेच चुकती करतो. मग तर झालं की नाही?"

बोलता बोलता ललितनारायणाने खिशात हात घालून वीस मोहोरा बाहेर काढल्या. त्या मोहोरा तंतुवीतीच्या अंगावर फेकून तो निघणार इतक्यात भगवान गौतम बुद्धांनी त्याचा हात धरला आणि ते त्याला म्हणाले,

" नाही ललितनारायणा, वीस मोहोरांनी नाही भरपाई होणार तंतुवीतीच्या नुकसानीची!"

" म्हणजे काय?" ललितनारायण रागाने म्हणाला, " तेवढीच तर किंमत सांगितली आहे त्यानं मला त्या लुगड्याची!"

" या लुगड्याची किंमत वीस मोहोरा नाही. त्याहून ती किती तरी अधिक आहे बेटा ! " गौतम बुद्ध म्हणाले,

ललितनारायणाला, काहीच कळेना. तो बावचळल्यासारखा होऊन भगवानांच्या तोंडाकडे नुसताच टकमक पाहत राहिला. त्यावर ते म्हणाले,

" ललितनारायणा, हे लुगडं कसं तयार झालं असेल याचा जरा विचार कर. प्रथम कुणीतरी शेतकऱ्यानं शेत नांगरलं. त्याची मशागत केली. त्यात सरकी पेरली. पुढं शेतीची देखभाल केली. मग कपाशी फुलली. तेव्हा शेतकऱ्याच्या बायकोनं बोंडं वेचली. कापूस जमवला. नंतर पिंजाऱ्यानं तो पिंजून स्वच्छ केला. आणखी कुणीतरी त्याचं सूत काढलं. ते सूत तंतुवीतीनं मागावर घातलं. त्याच्या बायकोनं खळ लावली. सूत कडक केलं. ते रंगवलं. अन् मग तंतुवीतीनं माग चालवून, डोळेफोड करून, राबून हे सुंदर लुगडं विणलं. कितीजणांचे कष्ट, वेळ, चिंता, विचार खर्ची पडले, तेव्हा हे लुगडं आकाराला आलं सांग पाहू ? आणि या साऱ्यांचं मोल वीस मोहोरा ? केवळ वीस मोहोरा ? "

ललितनारायण ऐकत होता. सारे लोक ऐकत होते. कुणाच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. भगवान गौतम बुद्ध पुन्हा बोलू लागले,

" येवढ्यानं भागलं नाही ललितनारायणा, तंतुवीतीनं विणलेलं हे लुगडं उद्या कुणीतरी खरेदी केलं असतं. आपल्या आईसाठी, बायकोसाठी, बहिणीसाठी नाहीतर लेकीसाठी. कुणीतरी बिचारी ते नेसली असती. नव्याकोऱ्या लुगड्याच्या हव्याहव्याशा वाटणाऱ्या वासानं हरखली असती. तिनं जीव लावून ते वापरलं असतं. धुवून धुवून बोळा होईपर्यंत ते अंगावर मिरवलं असतं. आता या चिंध्या कोण वापरणार ? त्या कुणाला नेसता येणार ? कितीजणांचे श्रम निव्वळ पाण्यात गेले. आणि कुण्या बापडीचा आनंदही आधीच नाहीसा झाला. केवढं नुकसान ! केवढा मनाचा हिरमोड ! ललितनारायणा, ही सगळी हानी वीस मोहोरांनी भरून येईल असं खरंच का वाटतं तुला ? "

ललितनारायण पाण्यात पडलेल्या ढेकळासारखा विरघळून गेला होता. भगवान बुद्धांच्या एकेका शब्दासरशी चाबकाचे फटकारे अंगावर बसावेत तशा त्याला वेदना होत होत्या. त्याचे डोळे भरून आले. तो घळघळा रडू लागला. भगवान गौतम बुद्धांचे झटकन पाय धरून तो म्हणाला,

" भगवान, मला क्षमा करा. मी फार मोठा अपराध केला आहे. " त्याने

तंतुवीतीचेही पाय धरले आणि तो त्याला म्हणाला, "मला क्षमा करा. मी तुम्हाला हव्या तेवढ्या मोहोरा देतो. शंभर, दोनशे, तीनशे. आता यापुढं मी स्वप्नात सुद्धा कुणाला दुखवणार नाही. कुणाचं नुकसान करणार नाही. कुणाला उपद्रव देणार नाही!"

तंतुवीतीचेही डोळे त्या एकंदर प्रसंगामुळे पाण्याने भरले होते. तो म्हणाला, "ललितनारायणा, तू मला लुगड्याची रास्त तेवढीच किंमत दे बरं! अधिक मोल मी मुळीच घेणार नाही!"

भगवान गौतम बुद्धांनी पुढे होऊन ललितनारायणाला पोटाशी धरले. त्याचे डोळे आपल्या हाताने पुसले. मग त्याला कुरवाळून ते दुकानातून बाहेर पडले. आपल्या शिष्यांसह चालू लागले. जमलेली गर्दी हळूहळू पांगली. ललितनारायणाने वीस मोहरा काढून तंतुवीतीच्या हाती ठेवल्या आणि पुन्हा एकवार त्याची क्षमा मागून आपल्या मित्रांसह तो तिथून निघाला. त्याचा चेहरा गंभीर, विचारी, उदास दिसत होता. पण तिथे प्रसन्नताही होती. आयुष्याचा अर्थ त्याला नव्याने कळला होता. भगवान गौतम बुद्धांच्या उपदेशाने त्याचा जणू पुनर्जन्म झाला होता.

# पांडुरंगाचा तवा

एका खेडेगावात पांडुरंग नावाचा एक मुलगा राहात होता. पांडुरंगाचे वय बारा तेरा वर्षांचे होते. त्याची आई तो लहान असतानाच देवाच्या घरी गेली होती. त्याचे वडील अगदी म्हातारे होते. शिवाय ते आंधळे होते. त्यामुळे त्यांना काही काम करता येत नसे. वडिलांची दृष्टी गेली तेव्हा पांडुरंग अगदीच लहान, जेमतेम आठ वर्षांचा होता. पण तेव्हापासून तो स्वतः कष्ट करून आपले आणि आपल्या म्हाताऱ्या, आंधळ्या वडिलांचे पोट भरीत असे. पांडुरंग खूप काम करायचा आणि पडेल ते काम करायचा. कुणाला रानातून काटक्या-कुटक्या वेचून आणून दे, कुणाच्या शेतातली रताळी नाहीतर भुईमूग उकरून काढून दे, कुणाचा निरोप पोहोचता कर, कुणा सुताराच्या नाही तर लोहाराच्या हाताखाली मदतनीस म्हणून काम कर– असे एक ना दोन, अनेक कष्ट तो सतत करीत असे.

पांडुरंग बाहेरची तर कामे करीच. पण घरात वडील म्हातारे आणि आंधळे असल्यामुळे घरातही त्याला बरेच राबावे लागे. सकाळीच उठून आंघोळ करून तो आपल्यासाठी आणि आपल्या वडिलांसाठी चार सहा भाकरी भाजून ठेवी. भाकरी झाल्या की त्याच तव्यावर तो एखादी पालेभाजी नाही तर कोरडे पिठले परतून घेई. जेवण झाकून ठेवून, वडलांना काय हवे नको ते पाहून मग पांडुरंग कामाला बाहेर पडे. दुपारी एक दीड वाजता तो घरी आला की आपले

आणि वडिलांचे पान वाढून घेई. मग दोघे बापलेक गप्पा मारीत मजेत जेवत. जेवण झाले की पांडुरंगाचे वडील कांबळ्यावर जरासे अंग टाकीत. त्यांना झोप लागेपर्यंत पांडुरंग त्यांचे पाय चेपत बसे. वडलांना झोप लागली आहे असे दिसले की त्यांच्या अंगावर एखादे पातळसे उपरणे टाकून, आपल्या खोपटाचे कवाड ओढून घेऊन, शेजाऱ्यांना वडिलांकडे लक्ष द्यायला सांगून पांडुरंग पुन्हा कामाला बाहेर पडे, तो संध्याकाळी दिवेलागणीच्या सुमाराला घरी परत येई. घरी आल्यावर पुन्हा तो तव्यावर भाकरी टाकी. भाकरीबरोबर सकाळची भाजी, कोरड्यास, काही तरी उरलेले भांड्यांतून झाकून ठेवलेले असायचेच. कधी कधी शेजारपाजारच्या बायका थोडा भात, आमटी आणून देत. जेवण झाले की पांडुरंगाचे वडील देवा विठ्ठलाचे एखादे भजन म्हणत असत. त्या भजनाचे गोड सूर, शब्द ऐकता ऐकता पांडुरंगाला कधी झोप लागून जाई ते त्याचे त्यालाही कळत नसे.

वयाच्या आठव्या वर्षापासून पांडुरंगाचे असे कष्ट चालले होते. मिळेल ते काम करून त्याने आपले घर चालवले होते, म्हाताऱ्या, आंधळ्या वडिलांचा सांभाळ केला होता. पांडुरंगाच्या प्रेमळ, कष्टाळू, सालस स्वभावामुळे तो सर्वांना भारी आवडे आणि सर्वांना त्याचे खूप कौतुक वाटत असे.

गेल्या पाचसहा वर्षांत पांडुरंगाने असे भरपूर कष्ट तर केले होतेच. पण त्याबरोबर त्याने थोडासा पैसाही जमा केला होता. तीनशे रुपये त्याने एका लहानशा पुरचुंडीत बांधले होते आणि ती पुरचुंडी कोपऱ्यातल्या कणगीत धान्यामध्ये लपवून ठेवली होती. त्याबरोबर त्याने वडिलांना व स्वतःला थोडेसे बऱ्यापैकी कपडेही केले होते. घरात चादरी, सतरंज्या विकत आणल्या होत्या. चार चांगली चुंगली भांडी खरेदी केली होती. पूर्वी भाजी आणि भाकरी येवढेच त्या बापलेकांचे रोजचे जेवण असायचे. आता हातांत थोडा पैसा खेळू लागला तसा पांडुरंग मधून मधून आपल्या म्हाताऱ्या वडिलांसाठी मऊ भात करू लागला. कधी मुगाची खिचडी शिजवू लागला. त्यासाठी त्याने भांडी विकत घेतली होती. शिवाय पांडुरंगाने हौसेने आपल्या हातात चांदीचे एक जाड कडे ठोकून घेतले होते आणि कमरेला चांदीची जाडजूड साखळीही करवून आणली होती. तो चालू लागला की त्या साखळीला बसवलेली घुंगरे छुमछुम वाजत. घुंगरांचा आवाज झाला की पांडुरंग घरी आल्याचे त्याच्या आंधळ्या वडिलांना

कळे. मग ते त्याला जवळ बोलावीत. "आलास माझ्या बाळा?" म्हणून प्रेमाने विचारीत. त्याला पोटाशी धरून त्यांच्या तोंडावरून आपला सुरकुतलेला हात मोठ्या मायेने फिरवीत.

पांडुरंग व त्याचे वडील यांचे घर गरिबीचे होते. पण त्या गरिबीतही ते दोघे बापलेक सुखासमाधानात दिवस काढीत होते. वडिलांना पांडुरंग अन् पांडुरंगाला वडील. दोघांचे एकमेकांवर फार प्रेम होते.

एके दिवशी रात्री पांडुरंग अन् त्याचे म्हातारे वडील गाढ झोपेत असताना त्यांच्या खोपटात चोर शिरले. पांडुरंगांच्या वडिलांची झोप त्या आवाजाने मोडली नाही. पांडुरंग मात्र चटकन जागा झाला. पण बिचारा करतो काय! चोरांनी त्याला जाग येण्याच्या आधीच त्याचे हातपाय दोराने करकचून गच्च बांधून टाकले होते. आणि एक चोर राखण म्हणून त्याच्याजवळ बसून राहिला होता. आरडाओरडा किंवा दंगामस्ती करण्यात काही अर्थ नाही हे पांडुरंगाच्या ताबडतोब ध्यानात आले. चोरांच्या हातांत भले मोठे दंडुके होते. पांडुरंगाने जरा गडबड करण्याचा किंवा तोंडातून शब्द काढण्याचा अवकाश, चोरांनी त्याचे टाळकेच सडकले असते. शिवाय त्या आरडाओरड्या-मुळे त्याचे म्हातारे आंधळे वडील जागे होऊन तेही ओरडू लागले असते तर कदाचित चोरांनी त्यांचे फारच हाल केले असते. स्वतःपेक्षाही पांडुरंगाला आपल्या वडिलांची जास्त काळजी वाटत होती. वडिलांना झोपेतून जाग येऊ नये म्हणून त्याने अगदी गुपचूप राहून जे होईल ते नुसते बघत राहावे असे ठरवले. दुसरे काय करणार बिचारा?

चोरांनी भराभर घर लुटायला सुरुवात केली. त्यांनी पांडुरंगाच्या कमरेची चांदीची साखळी काढून घेतली. त्याच्या हातातले कडे काढून घेतले. त्याने हौसेने विकत आणलेल्या सतरंज्यांचा अन् चादरींचा गठ्ठा करून तो बाजूला ठेवून दिला. तोवर दुसरा एक चोर पैसे शोधीत होताच. शोधता शोधता त्याने कणगीतल्या धान्यात हात खुपसला, तेव्हा पांडुरंगाची पैशाची पुरचुंडी त्याला सापडली. रुपयांनी भरलेली ती जड पुरचुंडी बघून चोरांना फार आनंद झाला. त्यांनी लगेच आतल्या पैशांचा अंदाज घ्यायला सुरुवात केली. तोवर आणखी एका चोराने सैपाकाच्या चुलीजवळ असलेल्या फळीवरची सारी भांडीकुंडी खाली काढली. कपडे, भांडी व इतर किरकोळ वस्तू साऱ्या एका मोठ्या



चादरीवर त्यांनी काढून ठेवल्या. पांडुरंग बिचारा बसल्या जागेवरून सगळे बघत होता. इतकी वर्षे जिवापाड कष्ट करून त्याने गोळा केलेला त्याचा छोटासा संसार चोरांनी एका घटकेत लुबाडून घेतला होता.

पांडुरंगाला उन्हातान्हात केलेले श्रम आठवले. दुपारी दोन दोन वाजेपर्यंत अन्नाचा घास तोंडात न घालता, पाण्याचा घोट न घेता शेतावर राबून केलेली मोलमजुरी त्याला आठवली. पैसा साठवण्यासाठी आपल्या लहान लहान इच्छा, हौशी आपण कशा वेळोवेळी दडपून ठेवीत होतो; पतंग, गोट्या, विटीदांडू असे साधे खेळदेखील आपण कसे वर्ज्य केले होते; कष्टातच आपला सगळा वेळ कसा जात होता ते सारे सारे त्याला आठवले. इतके कष्ट करून, इतक्या साध्या आनंदाला नकार देऊन त्याने जमवलेली त्याची दौलत चोर आता एका घटकेत पळवणार होते. उद्यापासून पांडुरंगाला पुन्हा पहिल्यासारखेच राबावे लागणार होते. पुन्हा पैपैसा जमवून तो गाठीला बांधावा लागणार होता. त्याचे मन निष्फळ संतापाने भरून गेले. त्याबरोबर त्याच्या डोळ्यांत पाणीही उभे राहिले.

चोरांना पांडुरंगाच्या मनःस्थितीची काय कल्पना असणार? ते आपले चांगली चोरी साधली, डबोले मिळाले याच आनंदात होते. लगेच त्यांनी त्या सर्व सामानाची मोटली बांधण्यास सुरुवात केली. चोरांनी प्रथम पांडुरंगाचे सणासुदीचे कपडे मोटलीत ठेवले. त्यावर त्यांनी त्याचा कोल्हापुरी वहाणांचा एकुलता एक जोड ठेवला. मग त्यांनी त्याची पैशाची पुरचुंडी त्यातच अलगद एकीकडे ठेवून दिली. पांडुरंग हालचाल न करता सारे पाहात होता. शेवटी चोरांनी मोटलीत भांडीकुंडी भरली. सरतेशेवटी चुलीवर भिंतीशी टेकून ठेवलेला लोखंडी तवा होता तोही एका चोराने काढून मोटलीत टाकला. आता मात्र पांडुरंगाचा जीव कळवळला. त्याला राहवेना. तो एकदम चोरांना म्हणाला,

"बाबांनो, तुम्ही आमचं सारं घर लुटलंत तरी त्याबद्दल मी तुम्हांला काही एक म्हणत नाही. पण तेवढा तो तवा मात्र तुम्ही ठेवाल तर फार बरं होईल. मी तुमच्यापुढे हात जोडतो, तुमच्या पाया पडतो. पण आम्हांला निदान तेवढा तवा तरी राहू द्या!"

त्याचे बोलणे ऐकून चोरांना हसू आले. एक चोर कुचेष्टेने पांडुरंगाला म्हणाला,

"कारे, बाबा? त्या तव्यावाचूनच तुझं अगदी येवढं काय अडलंय? लोखंडाचाच आहे ना तवा? सोन्याबिन्याचा तर नाही ना?"

"तवा सोन्याचा नाही. लोखंडाचाच आहे." पांडुरंग म्हणाला, "पण त्याच्यावाचून माझं खरोखर अडणार आहे. माझे वडील म्हातारे आहेत. आंधळे आहेत. ते काही सुद्धा काम करू शकत नाहीत. म्हणून म्हणतो, तुम्ही तेवढा तवा राहू द्या, म्हणजे त्यावर दोन भाकरी भाजून मला माझ्या वडिलांना दोन वेळ जेवू तरी घालता येईल! तवा तुम्ही नेलात तर मात्र त्यांची अगदी उपासमार होईल हो!"

बोलता बोलता पांडुरंगाचा गळा दाटून आला. त्याला हुंदका फुटला. त्याच्या डोळ्यांत जमलेले पाणी एकदम गालांवर ओघळले. त्याच्या तोंडून शब्द निघेना.

पांडुरंगाचे ते बोलणे ऐकून, त्याच्या डोळ्यांतून वाहणारे पाणी बघून चोर आश्चर्याने थक्क झाले. त्यांनाही काही बोलवेना. पांडुरंगाच्या प्रामाणिकपणाचे, त्याच्या दरिद्री संसाराचे, त्याच्या कष्टांचे, त्याच्या दुःखाचे मूर्तिमंत चित्र

त्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. आपल्या चोरीच्या धंद्याची आयुष्यात पहिल्यांदाच त्यांना अतोनात लाज वाटू लागली. आपल्या चोरीमुळे या लहानग्या सालस मुलाचे आणि त्याच्या म्हाताऱ्या आंधळ्या वडिलांचे आयुष्य कसे दुःखात बुडून जाणार आहे हे त्यांना कळून चुकले, इतकेच नव्हे तर आजवर किती लोकांना आपण असे दुःखात बुडवले असेल कुणास ठाऊक हाही विचार त्यांच्या मनात येऊन गेला.

चोरांच्या टोळीचा जो प्रमुख नायक होता त्याला तर फारच पश्चात्ताप झाला. कारण तो लहानपणापासून पोरक्या अवस्थेतच वाढला होता. आई-वडिलांचे सुख त्याला कधी ठाऊकच नव्हते. तो एकदम पुढे झाला. पांडुरंगाच्या हातापायांना बांधलेले दोर सोडून त्याने त्याला मोकळे केले. आणि मग त्याच्या खांद्यावर हात ठेवून तो प्रेमाने त्याला म्हणाला,

"मुला, तुझ्यासारख्या छोट्या, गरीब, प्रामाणिक अन् कष्टाळू मुलाची दौलत लुबाडली तर आम्हाला खचित पाप लागेल. आम्ही तुझा तवा तर तुला परत देतोच, पण तुझ्या ज्या ज्या वस्तू आम्ही पळवणार होतो त्या एकूण एक वस्तूही आम्ही तुझ्या तुला परत देऊन टाकतो. तू आपल्या वडिलांबरोबर सुखाने राहा बरे!"


चोरानी पांडुरंगाच्या सगळ्या सामानाची मोटली जिथल्या तिथे ठेवली. त्याच्याकडे एकवार मायाळूपणाने हसून पाहिले आणि दुसऱ्याच क्षणी ते सर्व चोर दाराबाहेर पडले. हां हां म्हणता बाहेरच्या काळोखात दिसेनासे झाले.

# भुवईवरचा वण

उज्जयिनी नगरीत एक श्रीमंत सावकार राहात होता. या सावकाराचा एकुलता एक मुलगा होता. त्याचे नाव होते श्रीकुमार. श्रीकुमार तरुण, देखणा आणि फार सुस्वभावी होता. तो तऱ्हेतऱ्हेचे खेळ खेळण्यात, मृगया करण्यात, नाना प्रकारची वाद्ये वाजवण्यात पटाईत होता. आपल्या सुंदर रूपामुळे, खेळातल्या नैपुण्यामुळे आणि गोड स्वभावामुळे साऱ्यांची मने तो जिंकून घेई.

एके दिवशी संध्याकाळी श्रीकुमार आपल्या वाड्याच्या गच्चीवर उभा होता. त्या गच्चीवरून आसपासचा सर्व परिसर दिसे. उज्जयिनी नगरीतली मोठमोठी उपवने आणि उद्याने, धनिकांचे सुंदर प्रासाद, मधूनमधून निळ्या पाण्याने हेलकावणारे जलाशय तिथून स्पष्ट दिसत होते. सुवर्णमंदिरांचे कळस मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणांत झळकत होते. श्रीकुमाराचे डोळे त्या सुंदर देखाव्यावरून सावकाश फिरत होते. त्याचे मन प्रसन्न झाले होते.

अचानक श्रीकुमाराची दृष्टी एके ठिकाणी स्थिरावली. त्याच्या वडिलांच्या वाड्यापलिकडे मध्ये दोन तीन वाडे टाकून, एक खूप मोठा वाडा होता. त्या वाड्यासमोर भली थोरली बाग होती. बागेत एक बकुळीचे झाड होते. झाडाला दगडी पार बांधलेला होता, आणि त्या पारावर एक तरुण मुलगी बसली होती. ती मोराला नाच शिकवीत होती. त्या मुलीच्या चेहऱ्याची डावी बाजू



श्रीकुमाराला दिसत होती. त्या मुलीचे सौंदर्य पाहून श्रीकुमाराचे डोळे दिपून गेले. तो थक्क झाला. तिचा सडसडीत बांधा, गोरापान रंग, मोराला नाच शिकवताना तिच्या गोंडस हातांच्या, लांबट कोवळ्या बोटांच्या होणाऱ्या सुरेख हालचाली– सारेच अगदी मन वेधून घेणारे होते. श्रीकुमार त्या मुलीकडे टक लावून बघत होता. त्याला ती फारच आवडली. ताकाळ त्याने आपल्या मनाशी निर्धार केला, " करीन तर या मुलीशीच लग्न करीन ! "

श्रीकुमाराने आपला निश्चय आपल्या आईवडलांना कळवला. त्याच्या वडलांनी– श्रीनिवास श्रेष्ठींनी– त्या मुलीची माहिती काढायला आपल्या पत्नीला सांगितले. दुसऱ्याच दिवशी श्रीकुमाराची आई त्या मुलीच्या घरी गेली. तिने मुलीची सर्व माहिती काढून आणली. त्या मुलीचे वडील इंद्रसेन हे एक शूर सरदार होते. मुलीचे नाव मंगला असे होते. घर श्रीमंताचे, कुलीनाचे होते. मंगला तर फारच चांगली मुलगी होती. फक्त एकच गोष्ट श्रीकुमारच्या आईला खटकली होती. ती म्हणजे मंगलेच्या उजव्या भुवईवर एका मोठ्या जखमेचा खोल व्रण होता. भुवई अर्धी चिरून गेली होती. तिथले केसही नाहीसे झाले होते. त्यामुळे तिच्या सुंदर चेहऱ्याला गालबोट

लागले होते. श्रीकुमारने मंगलेच्या चेहऱ्याची डावीच बाजू पाहिलेली होती. त्यामुळे तिच्या चेहऱ्यातला हा दोष त्याच्या ध्यानी आला नव्हता.

मंगलेच्या आईवडलांना भेटून आल्यावर श्रीकुमारच्या आईने त्याला बोलावून घेतले. तो अतिशय उत्सुकतेने आईला म्हणाला,

" आई, पाहिलीस तू मुलगी ? "

" पाहिली. "

" नाव काय आहे तिचं ? "

" मंगला. "

" वा ! रूपाप्रमाचेच नावही चांगले आहे, घर कुलीनाचं आहे ना ? तिथलं वळण चांगलं आहे ना ? "

" होय बाळा. ते लोक आपल्यासारखेच कुलीन आहेत. घरंदाज आहेत. आणि फार सज्जन आहेत. "

" तर मग आई, हे लग्न ठरवून टाका तुम्ही ! "

" पण श्रीकुमार, ती मुलगी— "

" नाही आई. मला काही ऐकायचं नाही. " श्रीकुमार मध्येच आपल्या आईला अडवीत म्हणाला, " मुलगी चांगली आहे. घराणं चांगलं आहे. तर मग हे लग्न व्हायलाच हवं. माझा निश्चय अगदी ठरला आहे ! "

एवढे बोलून श्रीकुमार लगबगीने तिथून निघून गेला. त्याने आईचे बोलणे पुरते ऐकूनच घेतले नाही. आणि मंगलेच्या चेहऱ्यावर उजवीकडे भुवईवर मोठा वण आहे हे सांगायलाही त्याने आईला सवड दिली नाही. आई निरुपायाने गप्प राहिली.

सरतेशेवटी श्रीकुमार आणि मंगला यांचे लग्न ठरले. मंगलेचे आईवडील लग्न ठरवताना फार घाबरत होते. कारण आपल्या मुलीच्या चेहऱ्यातला दोष भावी जावयाला अजून कळलेला नाही हे त्यांना ठाऊक होते. रीतीप्रमाणे नवरा मुलगा मुलीला लग्नाआधी पाहूही शकत नव्हता. त्याचे आईवडीलच मुलीला बघायला गेले होते. आणि त्यांना मुलगी पसंत पडली होती. मंगलेच्या भुवईवर वण असला तरी तिचे बाकीचे रूप, तिची नम्र वागणूक, तिच्या एकंदर हालचालींतला, स्वभावातला गोडवा यामुळे ते तिच्यावर अगदी खूष झाले होते !

लग्नाचा दिवस उजाडला. मंगलेच्या मैत्रिणींनी तिच्या अंगावर वधूचा पोषाख चढवला. तिला दागदागिने घातले. तिच्या पावलांवर कुंकवाने सुंदर स्वस्तिके रेखाटली. तिच्या हातात पाचूचे हिरवेगार चुडे भरले. तिच्या डोळ्यांत काजळ रेखले. कपाळी मळवट भरून त्यांवर कुंकुमाक्षता चिकटवल्या. मग त्यांनी तिच्या मस्तकावर फुलांची जाळी चढवली. तिला फुलांच्या, मोत्यांच्या मुंडावळी बांधल्या. नवरीच्या वेषातली मंगला फारच देखणी दिसत होती. मुंडावळीच्या भरगच्च पदरांखाली तिच्या भुवईवरचा वण पार झाकून गेला होता.

श्रीकुमार तर छानच नवरदेव सजला होता. आधीच तो दिसायला सुरेख होता. उंच, सावळा, तरतरीत. त्यात अंगाला हळद माखलेली. त्यामुळे त्याचे तांबूस सावळेपण अधिकच खुलले होते. रेशमी अंगरखा, धोतर, रेशमी फेटा, वर मोत्यांच्या व फुलांच्या मुंडावळी. त्याला बघताक्षणी दृष्ट लागेल असे वाटत होते. तो फार प्रसन्न झाला होता. मनातल्या आनंदाचे आणि उत्सुकतेचे गोड प्रतिबिंब त्याच्या चेहऱ्यावर उमटले होते. जी मुलगी आपल्या मनात भरली, तीच घटकाभराने आपल्या गळ्यात वरमाला घालणार आहे, याबद्दलचा आनंद होता तो!

लग्नाचा सोहळा, मेजवान्या, देणीघेणी, आहेर सारे काही थाटात आटोपले. श्रीकुमार फार आतुर झाला होता. त्याच्या लाडक्या राणीची आणि त्याची अजून नीटशी गाठभेटच होत नव्हती. ती त्याला दिसे. पण ओझरती. कधी लग्नाचे मंगल विधी पार पाडताना, कधी हाताला हात लावताना, कधी पंक्तीत एकमेकांना घास भरवताना, कधी मैत्रिणींच्या मेळाव्यात, तर कधी नातेवाइकांच्या गराड्यात. प्रत्येक वेळी तिच्या चेहऱ्यावरून जाळीदार झिरझिरीत रेशमी शेला पांघरलेला असे. श्रीकुमार मनातून फार उतावीळ झाला होता. त्याला वाटे, कधी हे सारे सोहाळे संपणार? कधी मी माझ्या राणीची भेट घेणार? शेवटी सर्व समारंभ आटोपला आणि मंगला आपल्या सासरी आली.

श्रीकुमार आपल्या खोलीत अधीरतेने तिची वाट बघत होता. हिरवागार जरीकाठी शालू नेसलेली, हिऱ्यामाणकांच्या दागिन्यांनी झळकणारी, फुलमाळांनी सजलेली मंगला हलके हलके मंद पावले टाकीत आपल्या पतीजवळ येऊन उभी राहिली. तिच्या तोंडावर तो रेशमी शेला होताच. श्रीकुमारने

हसून मंगलेच्या तोंडावरचा शेला दूर केला, आणि...विलक्षण धक्का बसून तो दोन पावले मागे सरकला. मंगलेच्या देखण्या चेहऱ्यावरील उजव्या भुवईवरचा तो खोल उभा वण, तिथले नाहीसे झालेले केस... सारेच मोठे विचित्र दिसत होते!

श्रीकुमार पुतळ्यासारखा निश्चल उभा होता. मंगलेने एकदम धावून त्याचे पाय घट्ट धरले. आणि ते आसवांनी भिजवीत, हुंदके देत ती त्याला म्हणाली, "आम्ही आपली फसवणूक केली आहे. मी सुंदर नाही. कुरूप आहे. पण आपण मला दूर लोटू नका. मी जन्मभर या घरात राबेन. सर्वांची मनापासून सेवा करीन..."

श्रीकुमार एकदम भानावर आला. आपण दचकल्यामुळे मंगलेच्या मनाला मोठा धक्का बसला आहे हे त्याच्या ध्यानात आले. तिचे अश्रू पाहून, तिचे केविलवाणे शब्द ऐकून त्याला अतिशय वाईट वाटले. त्याने तिला उठवून आपल्या शेजारी बसवले. आपल्या हातांनी तिचे डोळे पुसले आणि मग तो हलकेच, प्रेमळ शब्दांत तिला म्हणाला,

"रडू नकोस मंगले. पण मला हे सांग, हा वण तुझ्या भुवईवर कधी पडला? कसा पडला? तुला ही जखम कशानं झाली? सांग, सांग मला. मुळी-सुद्धा भिऊ नकोस. अगदी सारं काही सांग!"

मंगलेने पदराने डोळे कोरडे केले. तिला धीर आला. तिचे मन शांत झाले. मग ती सांगू लागली,

"बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. आपल्या उज्जयिनीपासून पंधरावीस कोसांवर कालप्रियनाथाचे मंदिर आहे ना, तिथे दरवर्षी माघ महिन्यात शिव-रात्रीला मोठी जत्रा भरते. मी चार एक वर्षांची असेन त्यावेळी. आम्ही सगळी-जण जत्रेला गेलो होतो. तिथं मोठा थोरला तंबू घालून आम्ही चारपाच दिवस राहिलो होतो. सोबत आई, बाबा, नोकरचाकर होते. आमच्याप्रमाणेच आणखीही कित्येक माणसं त्या जत्रेला आली होती. तीही तंबू घालून तिथे राहिली होती. आंब्याचे दिवस होते. आंबराईत झाडांना मोहर आला होता. काही झाडांवर कोवळ्या कैऱ्या लागल्या होत्या. मुलं झाडांवर दगड मारून कैऱ्या पाडीत. आमच्या शेजारच्या तंबूतल्या एका मुलानं एका आंब्यावर दगड मारला. त्याचा नेम चुकला अन् तो दगड नेमका माझ्या उजव्या भुवईवर जोरात बसला!

खूप मोठी खोक पडली मला. भळभळा रक्त वाहू लागले. किती तरी रक्त गेलं. मुलं तर कधीच पळून गेली होती. दगड कोणत्या मुलानं मारला, आम्हाला कळलं सुद्धा नाही. माझ्या आईबाबांनी लगेच तिथून आपला मुक्काम हलवला. आम्ही इथं घरी निघून आलो. कसली जत्रा नि कसलं काय! मग वैद्यांनी माझ्या जखमेवर उपचार केले. ती शिवली. जखम बरी झाली. पण हा खोल वण मात्र कायमचाच राहून गेला. आणि भुवईचे केस तर गेले ते गेलेच!"

मंगला बोलत होती. तिचे बोलणे ऐकताना श्रीकुमाराचा चेहरा अधिकाधिक खिन्न होत गेला. तिचे बोलून संपले तेव्हा त्याने चटकन पुढे झुकून तिचे हात आपल्या हातांत घेतले आणि अतिशय दुःखी स्वरात तो तिला म्हणाला,

"मंगला, तुला एक गोष्ट सांगू? तुझा विश्वास बसणार नाही कदाचित. पण दगड मारून कैऱ्या पाडणारा जत्रेतला तो दुष्ट मुलगा या क्षणी तुझ्या-समोर उभा आहे! मीच तो मुलगा! मंगले, मला आठवतं, त्या वर्षी मी जत्रेत इतका हुंदडलो, इतक्या कच्च्या कैऱ्या पाडून खाल्ल्या की नंतर सर्दी पडशानं, खोकल्यानं मी महिनाभर अंथरूण धरलं होतं. माझा एक दगड नेम चुकून शेजारच्या तंबूतल्या कुणाला तरी लागला होता हे मला आठवतं. पण मी भित्र्यासारखा पळ काढला तिथून! मंगला, देवानं आपली पुन्हा गाठ घालून दिली हे किती चांगलं झालं. तुझ्यावर त्या वेळी मी जो अन्याय केला त्याची भरपाई करण्याची देवानं मला संधी दिली हे मी माझं मोठं भाग्य समजतो. तू प्रथमदर्शनीच मला आवडली होतीस. पण आता तर तू मला आणखीच आवडू लागली आहेस. मंगला! माझी लाडकी गोड मंगला!"

श्रीकुमाराने मोठ्या प्रेमाने मंगलेला आपल्याजवळ घेतले. तिला कुरवाळले. तिच्या उजव्या भुवईवरच्या वणावरून हळुवारपणे बोट फिरवले. मग तो तिला म्हणाला,

"मंगले, तुझी काजळाची डबी आण पाहू. मी तुला सुंदरशी भुवई रेखाटून देतो."

मंगलेने आपली काजळाची डबी आणून श्रीकुमाराच्या हातात दिली. त्याने चांदीची शलाका हाती घेतली आणि आपल्या पत्नीच्या कपाळावर उजवीकडे काजळाने सुंदर वळणदार भुवई रेखाटली. अगदी डावी भुवई होती तशीच, हुबेहूब!

आता मंगलेच्या चेहऱ्यात काही व्यंग आहे, उणीव आहे हे कुणालाही कळण्याची भीती उरली नव्हती.

त्यानंतर रोज सकाळी मंगलेचे स्नान झाले की श्रीकुमार पहिली गोष्ट हीच करी. आपल्या पत्नीच्या चेहऱ्यावर उजवीकडे एक सुरेख भुवई रेखाटून देई.

त्या नवराबायकोंचा संसार फार सुखाचा झाला. त्यांचे सारे आयुष्य आनंदात गेले.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
अ. क्र. २४५९
दा. २४२२
विषय बा. क.

# पुष्कर आणि शेवंती

फार फार प्राचीन काळातली गोष्ट आहे ही. सह्याद्री पर्वताच्या कुशीत, एका मोठ्या पठारावर, शंकराचे एक अगदी पुरातन असे सुंदर देवालय होते. देवळाच्या मागल्या बाजूला खोल दरी होती. पठाराच्या उतारावर सुरेख पिवळ्याधमक अशा शेवंतीच्या फुलांचा जणू गालिचाच पसरलेला असे. वर्षाचे बारा महिने या शेवंती फुलत, एकेक फूल तळहाताएवढे मोठे. सोन्यासारखे पिवळेजर्द. आणि सुवासाने नुसते घमघमणारे. इतक्या सुंदर, सुगंधी शेवंती दुसरीकडे कुठेही बघायला मिळत नसत.

एके दिवशी पुष्कर नावाचा एक तरुण कवी फिरत फिरत तिथे आला. त्याला तो शेवंतीचा पिवळा गालिचा इतका आवडला की त्याने त्या पठारावरच घर बांधून राहायचे ठरवले. पुष्कर हा घरचा चांगला श्रीमंत होता. त्याला आईवडील, भाऊबहीण कुणीच नव्हते. त्यामुळे त्याला घरचे काही पाश नव्हते. पठारावर राहाण्याचा विचार मनात येताच पुष्कराने लगेच तिथे एक छोटेसे देखणे घर बांधले आणि त्या घरात राहून तो आपले लेखनवाचन करू लागला. तिथे त्याचे दिवस मोठ्या आनंदात चालले होते.

पुष्कराच्या लिहिण्याच्या खोलीला एक मोठी खिडकी होती. त्या खिडकी-तून त्याला तो पठाराचा उतार आणि त्यावर बहरलेली ती शेवंतीची पिवळी-धमक फुले दिसत. वाचून किंवा लिहून थकवा आला, डोळे दुखू लागले की,

पुष्कर त्या खिडकीतून समोर नजर टाकी. शेवंतीचे बहरलेले ताटवे पाहिले की त्याचा सारा शीणभाग नाहीसा होई आणि तो पुन्हा नव्या उत्साहाने आपल्या कामाला लागे. एकदा अशीच लिहिता लिहिता पुष्कराने खोलीच्या खिडकीतून बाहेर नजर टाकली. तो त्याला शेवंतीच्या त्या पिवळ्याजर्द फुलांमध्ये पिवळी रेशमी साडी नेसलेली, पिवळी चोळी अंगात घातलेली, पिवळ्यागोऱ्या रंगाची एक अतिशय सुंदर तरुण मुलगी उभी असलेली दिसली. तिला पाहून पुष्कर अगदी चकित होऊन गेला. तिच्याशी बोलावे, तिची विचारपूस करावी असे त्याला उत्कटतेने वाटले. तिच्याशी बोलण्यासाठी तो लगबगीने घराबाहेर आला. पण त्याला बघताक्षणी ती मुलगी तात्काळ त्या शेवंतीच्या भरदार रोपांतच नाहीशी झाली.

त्यानंतर अनेकदा पुष्कराला ती तरुण मुलगी दिसे. कधी सकाळच्या कोवळ्या उन्हात तर कधी संध्याकाळच्या तांबड्या सोनेरी मावळत्या संधिप्रकाशात. कधी ती शेवंतीची फुले कुरवाळीत राही, तर कधी ती नुसतीच उदासवाण्या चेहऱ्याने उभी असे. पुष्कराने अनेकदा तिला गाठण्याचा प्रयत्न केला. पण तो जवळ आला रे आला की, त्या तरुण मुलीने त्याला झुकांडी द्यावी. असे अनेक वेळा झाले. तेव्हा पुष्कर मनातून विलक्षण खिन्न होऊन गेला. त्याच्या कवितेचा प्रवाह आटला. त्याचे वाचन थांबले. त्याला काही सुचेना की रुचेना. त्याला दिवसा जेवण जाईना की रात्री झोप येईना. त्याला एकसारखा त्या सुंदर पण रहस्यमय मुलीचा ध्यास लागून राहिला. सरतेशेवटी त्याने असे ठरवले की, आपणही शेवंतीच्या त्या गर्द रोपट्यातच लपून बसावे. म्हणजे तरी ती मुलगी आपल्याला सापडेल. त्याप्रमाणे एके दिवशी पुष्कर त्या रोपट्यात लपून बसला, तेव्हा अचानक ती मुलगी त्याच्या पुढ्यात आली. तिच्या सौंदर्याने पुष्कर इतका चकित झाला की क्षणभर त्याच्या तोंडून शब्दच फुटेना. तो टकमक तिच्याकडे बघत राहिला. तिनेही क्षणभर त्याच्याकडे पाहिले. दुसऱ्याच क्षणी तोंड फिरवून ती धावत सुटली. पुष्कराने तिचा पाठलाग केला. पण व्यर्थ. एकाएकी ती दिसेनाशी झाली. पुष्कर तिथे येऊन पोहोचला तेव्हा त्याला एका झाडावर झुलणारे शेवंतीचे एक भले थोरले फूल मात्र दिसले.

अगदी उदास होऊन पुष्कर घरी परत आला. पण त्याला काही केल्या चैन

पडेना. ध्यानी, मनी, स्वप्नी त्याला ती सुंदर मुलगीच एकसारखी दिसू लागली. मग त्याने आपल्याजवळचा एक सुरेख, जाड, गुळगुळीत कागद घेतला. आपला अगदी नाजुक, कोरीव टोक असलेला बोरू घेतला आणि त्या बोरूने रेखीव, वळणदार अक्षरांत त्याने पुढील कविता लिहून काढली :

ये मजपाशी लाजु नको रे
शेवंतीच्या फुला कोवळ्या,
सांभाळिन तुज जिवापलिकडे
ना तरि गळतिल तुझ्या पाकळ्या !

मग त्याने तो कागद बाहेर आणला आणि शेवंतीच्या वाफ्यात, एका रोपावर, कुणालाही सहज दिसेल अशा बेताने लटकावून ठेवला.



त्या दिवशी संध्याकाळी पुष्कर खिन्नपणे एकटाच आपल्या घरात बसला होता. इतक्यात आपल्या दाराबाहेर त्याला रेशमी वस्त्रांची सळसळ ऐकू आली. कुणीतरी नाजूक बोटांनी दारावर हलकेच टकटक केले. पुष्कराने उठून दार उघडले. त्याबरोबर शेवंतीच्या ताटव्यात इतके दिवस त्याच्याशी लपंडाव

खेळणारी ती सुंदर मुलगी लाजत लाजत आत आली. तिला बघून पुष्कराला विलक्षण आनंद झाला. तो बावरल्यासारखा टकमक तिच्याकडे पाहात राहिला. त्यावर ती मुलगी हलकेच त्याला म्हणाली,

" मला तुमची भारी भीती वाटायची. पण आता मला समजलंय की तुम्ही कवी आहात. सौंदर्यावर तुम्ही प्रेम करता. तर मग आता नाही मी तुमच्यापासून दूर पळणार ! "

आणि ती एकदम फार गोड हसली.

" तू कोण आहेस ? " पुष्कर आतुरतेने तिला विचारू लागला, " तुझं नाव काय ? तू या पठारावर, फुलांच्या ताटव्यांत एकटीच का राहातेस ? "

" माझं नाव आता मी विसरून गेले आहे. " ती मुलगी म्हणाली, " आणि मी एकटीनंच आयुष्य घालवावं असा मला शाप मिळालेला आहे. मला या जगात दुसरं कुणीच नाही. मी या फुलांच्या संगतीनं राहाते. आजवरचं माझं आयुष्य फार दुःखात गेलं आहे. पण आता तुम्ही मला भेटलात. तुम्हाला घाबरण्याचं काही कारण नाही हेही मला कळलं. मला आता खूप खूप आनंद झाला आहे. तुम्ही कवी आहात. होय ना ? मी पण कधी कधी कविता करते. माझी एक कविता तुम्ही ऐकाल ? "

पुष्कराने आनंदाने मान डोलावली. त्यावर ती मुलगी नाजुक स्वरात कविता म्हणू लागली,

दिशा वादळी, काळवंडले आभाळ सारे
मुक्या कळीला झोंबत आहे वादळवारे
कविराया तू अपुल्या हातांचा आधार देई
गोड सुवासे भरीन तुझी ओंजळ मीही !

कविता म्हणून होताच त्या मुलीने लाजून खाली मान घातली. पुष्कर उठला आणि तिच्याजवळ जाऊन, तिच्या कानाशी ओठ नेऊन हळूच पुटपुटला,

" शेवंती– होय, मी तुझं नाव शेवंतीच ठेवलंय–आजपासून तू माझी झाली आहेस, बरं का ! आता तुला कसलंही दुःख, कसलीही काळजी करण्याचं कारण नाही. "

लौकरच शंकराच्या देवालयातल्या पुजाऱ्याने पुष्कर आणि शेवंती या दोघांचे लग्न लावून दिले. मग त्यांचा सुखाचा संसार सुरू झाला. एकमेकांच्या संगतीत काही वर्षे त्यांनी अगदी आनंदाने घालवली. रोज संध्याकाळी ती दोघे शेवंतीच्या ताटव्यांकडे फिरायला जात. कधी कधी शेवंती भल्या पहाटे उठे आणि ती एकटीच शेवंतीच्या ताटव्यांकडे फिरायला जाई. एके दिवशी अशीच खूप पहाटे ती उठली. तिने आंघोळ केली. कपाळी कुंकू लावले. आपले पिवळे पातळ ती नेसली. पिवळी चोळी तिने अंगात घातली. पुष्कर बिछान्यावर गाढ झोपेत होता. शेवंती हळूच त्याच्यापाशी येऊन उभी राहिली. तिचा चेहरा अगदी उदास होता. डोळे पाण्याने भरले होते. झोपलेल्या पुष्कराकडे बघत ती हलकेच पुटपुटली, " येते मी. आता माझ्या पाकळ्या गळून पडण्याची वेळ आली आहे. संपला आपला सुखाचा संसार. मी अशी मध्येच चालले आहे याबद्दल मला क्षमा करा. पण काय करू ? माझा नाइलाज आहे. "

मग पाय न वाजवता शेवंती तिथून निघून गेली. त्याचवेळी पुष्कराला एक स्वप्न पडत होते. त्या स्वप्नात त्याला एक विलक्षण दृश्य दिसले. तो शेवंतीच्या ताटव्यांमधून एकटाच हिंडत होता. हिंडता हिंडता तो एके ठिकाणी येऊन उभा राहिला. तिथे त्याला एक काळाकभिन्न, क्रूर माळी दिसला. आतापर्यंत पुष्कराने त्या ताटव्यांत माळी कधीच पाहिला नव्हता. त्या माळ्याच्या हातात एक खुरपे होते. आणि त्या खुरप्याने तो शेवंतीचे एक रोप मातीतून सुटे करीत होता. रोपावर भले थोरले, सुरेख फूल उमलले होते. माळ्याने ते रोप उपटून जमिनीवर फेकले. त्याबरोबर झाडावरच्या फुलाचे रूपांतर एका सुंदर तरुण मुलीत झाले. त्या मुलीचा चेहरा हुबेहूब शेवंतीसारखा—पुष्कराच्या शेवंतीसारखा होता. आता झोपेतच पुष्कराला एक गोष्ट कळून चुकली. आपली पत्नी हे खरोखर एक शेवंतीचे फूल आहे, त्या फुलाचा आत्मा तिच्या शरीरात वसतीला आला आहे हे त्याच्या ध्यानात आले.

पुष्कराला झोपेतून जाग आली. त्याची छाती धडधडत होती. सर्वांग घामाने डबडबले होते. तो ताडकन बिछान्यावरून उठला आणि धावतच शेवंतीच्या ताटव्यांकडे गेला. तिथे सारे शांत, निःस्तब्ध होते. सूर्य नुकताच उगवला होता. त्याचे पहिले कोवळे किरण शेवंतीच्या रोपांवर पसरले होते. पुष्कर भीतीने धावत सुटला. धावता धावता तो एका रोपापाशी येऊन पोहोचला.

पाहातो तो तिथे एक माळी आहे. अगदी पुष्कराच्या स्वप्नातलाच काळाकभिन्न माळी. तो माळी एका शेवंतीच्या रोपट्याच्या मुळाशी आपले खुरपे खुपसत होता.

"थांब! थांब!" पुष्कर ओरडला आणि त्याने त्या माळ्याच्या हातातून ते खुरपे ओढून घेतले. त्याचवेळी त्या रोपावरचे शेवंतीचे भले मोठे शेवंतीचे फूल भराभर उमलून पुष्करापुढे त्याची पत्नी, त्याची लाडकी शेवंती उभी राहिली.

पुष्कराने पुढे होऊन तिचा हात धरला आणि तो तिला प्रेमाने म्हणाला,


"मला सोडून कुठे चालली होतीस वेडे? चल. घरी चल." मग पुष्कराने त्या विशिष्ट रोपाभोवती एक भक्कम कुंपण घातले. आता कुणीही त्या रोपाला धक्का लावू शकणार नव्हते. अशा रीतीने ते शेवंतीचे रोपटे सुरक्षित झाल्यावर पुष्कराच्या शेवंतीला कसलीच भीती उरली नाही. मग पुष्कर आणि शेवंती यांनी अनेक वर्षे सुखाने संसार केला. बऱ्याच वर्षांनी ती दोघे खूप खूप म्हातारी होऊन मरण पावली. बागेतले ते शेवंतीचे रोपटे अजूनही जिवंत होते. ताजेतवाने होते. त्यावरचे मोठे थोरले फूल वाऱ्यावर हेलकावे खात डुलत होते. पण आता त्याच्या शेजारी आणखी एक रोपटे उगवले होते. आणि त्यावरही एक सुंदर फूल उमलले होते. पांढरे शुभ्र फूल. पुष्कराचे फूल.

# सयाजीचे पेरू

सयाजी माळ्याची पेरूची खूप मोठी बाग होती. त्याच्या बागेतले पेरू भले मोठे, पिवळे धमक आणि चवीला अतिशय गोड असत. झाडांवरून पेरू उतरवले की सयाजी ते एका मोठ्या हातगाडीवर रचून ठेवी. नंतर गाडी ढकलीत ती तो बाजारात घेऊन जाई. पण सयाजीचे पेरू इतके गोड होते की, बाजाराच्या वाटेने तो जात असतानाच बहुतेक पेरू खपून जात. रिकामी हातगाडी आणि पैशाने गच्च भरलेली पिशवी घेऊन सयाजी आनंदाने घरी परत येई.

एकदा सयाजी असाच रस्त्याने आपली हातगाडी ढकलीत ढकलीत चालला होता. पिकलेल्या पिवळ्याधमक पेरूंचा गोड वास सर्वत्र दरवळत होता. सकाळच्या कोवळ्या उन्हामध्ये पेरू सोन्यासारखे चमकत होते. लहान मोठी गिऱ्हाइके पेरूंवर अगदी तुटून पडत होती. इतक्यात अंगात भगवी कफनी घातलेला, पांढरी शुभ्र दाढी छातीवर रुळत असलेला आणि हातात रुद्राक्षांची माळ घेतलेला एक उंचापुरा, धिप्पाड, रुबाबदार संन्यासी समोरून अकस्मात आला आणि सयाजीच्या हातगाडीजवळ उभा राहिला. सयाजी त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागला. इतक्यात तो संन्यासी सयाजीला म्हणाला,

" माळीदादा, तुमचे पेरू छान आहेत. पण माझ्याजवळ पेरू विकत घ्यायला पैसे नाहीत. मला एक पेरू द्या ना ? "



"पैसे नाहीत अन् पेरू खायला हवाय म्हणता?" सयाजी रागाने म्हणाला, "वाहवा! बरेच आहात की हो संन्यासीबुवा! चला. पुढे चालू लागा. पेरूबिरू काही मिळायचा नाही. समजलात ना?"

"मी काही जास्त मागत नाही." संन्यासी पुन्हा काकुळतीने म्हणाला, "एक पेरू—फक्त एकच पेरू मला द्या. तो हातगाडीच्या कडेला असलेला अगदी लहानसासा पेरू आहे ना, तो सुद्धा चालेल मला. द्या ना. एकच पेरू मला द्या. नाही म्हणू नका."

"लहान नाही अन् मोठा नाही." सयाजी आणखीनच रागावून म्हणाला, "एक सुद्धा पेरू देणार नाही मी तुम्हाला! अरे वा रे वा! इतके चांगले सोन्यासारखे माझे पेरू. गिऱ्हाइकं वाटेल तेवढा पैसा देऊन ते खरेदी करतात. अन् तुम्हाला मात्र मी फुकट पेरू देऊ होय? चला. पुढं चला. पेरू नाही न् बिरू नाही! चले जाव!"

"माळीदादा, तुमच्या बागेमध्ये पेरूची इतकी झाडं आहेत. त्या झाडांवर दररोज शेकडो पेरू पिकतात. किती पेरू तर पाखरंही खाऊन जातात. आणि या पेरूवर तुम्ही इतके पैसे मिळवता. तर मग माझ्यासारख्या गरीब संन्याश्याला तुम्ही एखादा पेरू दिलात तर त्यात तुमचं असं काय मोठं नुकसान होणार

आहे बरं ? द्यानात का मला ऐकच पेरू ? देव तुमचं भलं करील."

एव्हाना रस्त्यावर खूप गर्दी जमली होती. लोक संन्याश्याचे बोलणे शांतपणे ऐकत होते. त्यांनाही सयाजीचा हट्ट आवडला नाही. त्याच्यापाशी हातगाडी भरून पेरू होते. त्यातला एक पेरू संन्याश्याला दिल्याने सयाजीचे काही फार मोठे नुकसान झाले नसते. एकदोघांनी त्याला तसे समजावून सांगितले सुद्धा. पण सयाजी कुणाचेच ऐकायला तयार नव्हता. त्याचा आपला एकच ठेका चालू होता, "माझा पेरू मी या संन्याश्याला फुकट काय म्हणून देऊ ? मुळीच देणार नाही !"

बाजारपेठेतल्या एका दुकानात बसलेले एक श्रीमंत शेठजी हा सर्व प्रकार बघत होते. त्यांना त्या संन्याश्याची दया आली. ते दुकानातून उतरून सयाजीच्या हातगाडीजवळ आले. एक चांगला, मोठा, रसरशीत, पिवळाधमक पेरू त्यांनी स्वतः पैसे देऊन विकत घेतला आणि तो त्यांनी संन्याश्याच्या हाती दिला.

संन्याश्याने शेठजींचे मनापासून आभार मानले. नंतर भोवती जमलेल्या सर्व लोकांवर नजर फिरवून तो म्हणाला,

"लोक हो, झालेला सर्व प्रकार तुम्ही पाहिलात. या शेठजींनी मला पेरू विकत घेऊन दिला. खरे तर मी एक संन्याशी माणूस आहे. जगातले सगळे मोह मी दूर लोटले आहेत. मग मला या एका पेरूचे काय करायचे आहे ? तुम्हाला एक गंमत ठाऊक आहे का ! माझ्याजवळ सुद्धा अगदी भरपूर पेरू आहेत. हवे आहेत का तुम्हांला ? बघा. आता मी तुम्हा सर्वांना पेरू खायला घालतो !"

लोक आश्चर्यचकित झाले. त्यांच्यातला एकजण म्हणाला, "असो संन्यासीबुवा, तुमच्याजवळ भरपूर पेरू आहेत म्हणता. पण ते कुठं आहेत ? आम्हांला तर कुणाला काही ते दिसत नाहीत."

"दिसतील. दिसतील." संन्यासी हसून म्हणाला, "पेरू दिसतील. पण त्या आधी पेरूचं झाड हवं. अन् झाड हवं असेल तर त्यासाठी आधी बी हवं. नाही का ? तेव्हा मी आता प्रथम पेरूची बी मिळवतो."

येवढे बोलून संन्याश्याने हातातला पेरू मोठ्या अधाशीपणाने खायला सुरुवात केली. त्याने ताबडतोब पेरूचा फन्ना उडवला. मग त्या पेरूची एक बी हातात घेऊन ती त्याने जमलेल्या साऱ्या लोकांना दाखवली. आणि तो म्हणाला,

" लोक हो. नीट बघा. आता ही बी मी जमिनीत पेरतो. बरं का ! "

त्याने लगेच आपल्या खांद्याला लटकावलेल्या झोळीतून एक खुरपे बाहेर काढले. त्या खुरप्याने त्याने जमिनीत एक लहानसा खळगा खणला. त्यात ते बी टाकले. नंतर वरची माती सारखी करून संन्यासी लोकांना म्हणाला, " आता या बीला पाणी घालायला हवं. नाही का? कुणी थोडेसं पाणी द्यायला हवंय. देता का? "

लोक गंमतीने सर्व प्रकार बघत होते. पेठेत एक हॉटेल होते. हॉटेलमधला पोऱ्या त्या गर्दीत उभा होता. त्याने धावत जाऊन हॉटेलातून पेलाभर पाणी आणले. खरे म्हणजे ते चहाच्या आधणाचे गरम पाणी होते. पण संन्याश्याने ते गरम पाणीच घेतले आणि मातीत ओतले. लोकांचे डोळे मातीवर खिळून राहिले होते. संन्याश्याने पाणी ओतताच हलके हलके माती हलू लागली. थोड्या वेळाने तिच्या पोटातून एक कोवळा हिरवागार अंकुर वर आला. बघता बघता तो वाऱ्यावर डुलू लागला. वाढू लागला. आणि थोड्याच वेळात पेरूचे एक सुंदर भरदार झाड तिथे उभे राहिले. झाडाला भरभर फांद्या फुटल्या. त्याच्यावर सुंदर पालवी डवरली. आणि त्या हिरव्या पालवीमधून शेकडो पेरू डोकावू लागले. पिवळेधमक, पिके, रसरशीत पेरू. उन्हात चमचम करणारे पेरू. सोन्यासारखे पेरू, गोड गोड पेरू !

लोक डोळे विस्फारून हा चमत्कार बघत होते. संन्यासी हसू लागला. मग तो लोकांना म्हणाला, " पेरू पाहून तुमच्या तोंडाला पाणी सुटलेलं दिसतंय. ठीक आहे. थांबा हं. मी तुम्हांला पोटभर पेरू खाऊ घालतो. "

संन्याशी भरभर झाडावर चढला. आणि त्याने पेरू तोडून ते लोकांकडे फेकायला सुरुवात केली. लोकांनी पटापट पेरू झेलले आणि ते आनंदाने पेरू खाऊ लागले. कुणी एक, कुणी दोन तर कुणी चार-चार सुद्धा पेरू खाल्ले. थोड्याच वेळात झाडावरचे सगळे पेरू संपले. मग संन्याशी झाडावरून खाली उतरला. त्याने पुन्हा झोळीतून खुरपे काढले. त्या खुरप्याचे घाव त्याने झाडावर घातले. काड, काड, काड, काड. काही घावांतच झाड मोडून पडले. संन्याशाने ते मोडके झाड सहजपणे उचलून खांद्यावर घेतले आणि लोकांकडे बघत, हसत हसत हात हलवून, त्यांचा निरोप घेऊन तो झपाट्याने पावले टाकीत चालू लागला. रस्त्याच्या कडेला वळून संन्यासी दिसेनासा होईपर्यंत लोक

त्याच्याकडे टक लावून बघत होते.

संन्याश्याभोवती जमलेल्या गर्दीत सयाजी माळीही उभा होता. टाचा वर करून, मान उंचावून तो संन्याश्याच्या सगळ्या हालचाली कुतूहलाने बघत होता. मनाशी आश्चर्य करीत होता. आपल्या पेरूंनी भरलेल्या हातगाडीची त्याला आठवणही राहिली नव्हती. आता संन्यासी निघून गेला. गर्दी पांगली. तेव्हा सयाजीही भानावर आला. आता त्याला आपल्या हातगाडीची आठवण झाली. लगबगीने तो हातगाडीकडे परत आला. बघतो तो काय ? हातगाडी-वरचा एकूण एक टपोरा, पिवळाधमक, पिका पेरू अदृश्य झालेला !

सयाजीच्या डोक्यात खाडकन उजेड पडला. संन्याश्याने जादूने निर्माण केलेले सगळे पेरू हे त्याच्या हातगाडीवरचेच पेरू होते. त्याने पुन्हा न्याहाळून पाहिले तर गाडीवरचे त्याचे खुरपेही नाहीसे झालेले, म्हणजे तेदेखील संन्या-श्यानेच पळवले होते तर ! सयाजीने आपली हातगाडी ढकलली. तर ती वाटेतच मोडून पडली. सयाजीने गाडीखाली डोकावून पाहिले. गाडीला आधारासाठी खालच्या बाजूला लावलेले लाकूड अर्ध्यावरच कुणी तरी कापल्यासारखे मोडले होते. सयाजी रागाने लाल झाला. तो धावत धावत संन्याश्याच्या मागे गेला. पण संन्यासी कधीच अदृश्य झाला होता. रस्त्याच्या वळणावरून पुढे गेल्यावर वाटेत सयाजीला गाडीचे आडवे लाकूड सापडले. लाकडाचा अर्धा तुकडा तिथे पडला होता.

सयाजीला आता सारे काही कळून चुकले. संन्याश्याने जादूने निर्माण केलेले आणि नंतर तोडून टाकलेले पेरूचे झाड म्हणजे त्याच्या हातगाडीखाली आधारासाठी लावलेले ते आडवे लाकूडच होते.

सयाजीच्या संतापाला आणि दुःखाला पारावार राहिला नाही. तो चिडून आरडाओरडा करू लागला. आपल्या डोक्याचे केस उपटू लागला. संन्याश्याला वाटेल तशा शिव्या देऊ लागला. पण आता संन्यासी, पेरू, झाड– काहीच उरले नव्हते. बाजारात गोळा झालेल्या सगळ्या जमावाने हसून सयाजीची हुर्यो करायला सुरुवात केली. कुणी त्याच्या चिक्कूपणाबद्दल त्याला नावे ठेवली. सयाजीने खाली मान घालून आपली मोडकी हातगाडी कशीबशी ढकलीत निमूटपणे पुन्हा आपल्या बागेची वाट धरली. बाजारपेठेत जायचे आता त्याला मुळी कारणच उरले नव्हते.

# गव्हाची लोंबी

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका खेडेगावात दोघे भाऊ राहात असत. ते दोघेही शेतकरी होते. दोघांच्याही वाट्याला जमिनीचे दोन लहान लहान तुकडे आले होते. दोघेही आपापल्या शेतात धान्य पिकवीत आणि त्यावर त्यांचा प्रपंच चाले. मोठ्या भावाचे नाव धोंडीबा, धाकट्या भावाचे नाव होते कोंडीबा. धोंडीबा जरा पैसे राखून होता. कोंडीबा मात्र त्यामानाने गरीब होता. धोंडीबाचे लग्न झालेले होते. त्याच्या बायकोचे नाव होते बायजा. बायजा मोठी कडक आणि स्वभावाने फार दुष्ट बाई होती. आपल्या धाकट्या दिराचा म्हणजेच कोंडीबाचा ती मनातून अत्यंत द्वेष करी. कोंडीबाचे अगदी वाटोळे व्हावे असे तिला सतत वाटायचे.

एका वर्षी नांगरणी पेरणीचे दिवस आले. कोंडीबाने आपले शेत चांगले नांगरले. पण पेरणीसाठी त्याच्याकडे अजिबात बी नव्हते. तो मग आपल्या भावाकडे– धोंडीबाकडे– गेला आणि त्याला म्हणाला,

"दादा, माझ्याकडे यंदा पेरणीसाठी बी नाही. मला थोडेसे गहू देतोस का ?"

धोंडीबा आपल्या बायकोकडे वळून म्हणाला, "बायजा, माळ्यावर गव्हाची पोती आहेत. त्यातले गहू पेरणीसाठी कोंडीबाला दे काढून."

"आता नाही मी माळ्यावर चढत." बायजा म्हणाली, मग दिराकडे

वळून ती बोलली, "तुम्ही उद्या सकाळी या. तोवर मी गहू काढून ठेवते. मग तुम्ही ते घेऊन जा हं!"

"ठीक आहे." कोंडीबा म्हणाला आणि तो आपल्या घरी आला. पेरणीसाठी आपल्याला गहू मिळणार याचा त्याला फार आनंद झाला. बायजा दुष्ट होती हे आधी सांगितलेलेच आहे. तिच्या दुष्ट मनात एक फार दुष्ट कल्पना आली. रात्री ती माळ्यावर चढली, तिने मोठे पातेले भरून गहू पोत्यातून उपसून काढले. आणि नवऱ्याच्या नकळत रातोरात ते गहू चुलीवर आधणाच्या पाण्यात टाकून तिने ते शिजवले. नंतर शिजवलेले गहू तिने पुन्हा पुसून पुसून चांगले कोरडे करून ठेवले. हे गहू कोंडीबाने जमिनीत पेरले तरी ते मातीत रुजणार नाहीत आणि कोंडीच्या शेतातून त्याला काही धान्य यंदा मिळणार नाही असा तिचा दुष्ट हिशेब होता. सकाळी कोंडीबा गहू मागायला आला तेव्हा शिजवून पुन्हा कोरडे केलेले गहू बायजाने त्याच्या पदरात ओतले. कोंडीबाची सगळी मेहनत वाया जाणार, त्याची फजिती होणार या कल्पनेने मनातल्या मनात बायजाला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. तिच्या दुष्ट स्वभावाला साजेसेच होते ते!

बिचारा कोंडीबा. आपल्या वहिनीने केलेल्या कपटाचा त्याला काहीच सुगावा लागला नाही. ते गहू आधी शिजवलेले आहेत हेही त्याला कळले नाही. त्याने नांगरलेल्या शेतात ते शिजवलेलेच गहू पेरले आणि शेतामध्ये रुजवा होण्याची ती वाट बघत बसला. पण एकदा शिजवलेले गहू रुजणार कसे? दोन-चार पाऊस सपाटून पडून गेले. पण कोंडीबाच्या शेतात काहीही रुजले नाही की उगवले नाही. नाही म्हणायला बायजाने दिलेल्या गव्हात एकच दाणा न शिजलेला असा होता. बायजाच्या नजरचुकीने तो चांगला दाणा त्या गव्हात मिसळला होता. तेवढा एक दाणा मात्र शेतात रुजला आणि त्यातून फक्त एक हिरवा अंकुर वर आला. त्या सबंध काळ्याभोर शेतात तेवढा एकच हिरवा अंकुर पाचूसारखा चमकत लखलखत होता.

आपल्या शेताची अशी दुर्दशा झालेली पाहून कोंडीबाला फार वाईट वाटले. पण तो जातिवंत शेतकरी होता. तो अतिशय कष्टाळू होता तसाच मोठा श्रद्धाळूही होता. त्याचा देवावर पूर्ण भरवसा होता. तो आपल्या मनाशी म्हणाला,

" असेना का एकच दाणा रुजलेला ? आपण त्यालाच पाणी घालू. त्याचीच मनापासून मशागत करू. मग जे व्हायचे असेल ते होईल. त्याची काळजी आताच कशाला ? "

आणि खरोखरच, कोंडीबा त्या एकाच अंकुराला जपू लागला. त्याची निगा राखू लागला. बघता बघता त्या अंकुराचे रोप झाले. ते रोप भराभर वाढू लागले. एखाद्या झाडासारखे ते दांडगे दिसू लागले. मग त्याला एक लोंबी आली. केवढी मोठी होती ती लोंबी! हात दीड हात लांब आणि चांगली टपोरी, भरगच्च, रोपाच्या आणि लोंबीच्या सावलीत कोंडीबाचे अर्धे शेत झाकून गेले.

पुढे त्या लोंबीत दाणे भरले. मग ते दाणे टपोरे झाले. गहू पिकला आहे असे पाहून कोंडीबाने एक कुऱ्हाड आणली. आणि कुऱ्हाडीचा घाव घालून त्याने ती लोंबी तोडली. पण लोंबी खाली पडते न पडते तो आभाळातून एक प्रचंड पक्षी झेपा घेत खाली आला. त्या चटकन ती लोंबी आपल्या चोचीत पकडली आणि तो पुन्हा आभाळात उडाला.

बिचारा कोंडीबा. तो लगेच त्या पक्ष्यामागे धावला. पक्षी आभाळातून भरारत चालला होता आणि कोंडीबा पाठलाग करीत जिवाच्या आकांताने जमिनीवरून धावत होता. सरतेशेवटी तो पक्षी आणि त्याच्याबरोबर कोंडीबा असे दोघेही समुद्रतीरावर येऊन पोहोचले.

मग एक मोठा चमत्कार झाला. तो पक्षी जमिनीवर उतरला. आणि कोंडीबाकडे वळून मनुष्यवाणीने तो त्याला म्हणाला,

" अरे वेड्या, या एका गव्हाच्या लोंबीला घेऊन काय करतोस ? आणि यातून निघालेल्या गव्हाची किंमत तरी अशी कितीशी येणार आहे ? या समुद्राच्या पलिकडे सुवर्णदेश आहे. तिथे तू माझ्याबरोबर येत असलास तर चल. मी तुला माझ्या पंखांवर बसवून या समुद्रापलीकडे घेऊन जातो. मग या तुझ्या लोंबीची किंमत म्हणून तू तिथून तुला हवे तेवढे सोने आणि चांदी घे बघ. तू खूप श्रीमंत होशील. "

पक्ष्याचे बोलणे कोंडीबाला पटले. तो जपून हलकेच पक्ष्याच्या पाठीवर चढला, पक्ष्याने त्याला आपले डोळे झाकून घ्यायला सांगितले. कोंडीबाने डोळे झाकून घेताच पक्ष्याने आभाळात उंच भरारी मारली. कोंडीबाने डोळे गच्च मिटून घेतले होते. पक्ष्याच्या वेगामुळे अंगाला घासून मागे जाणारा



वारा कोंडीबाच्या तोंडावर, कानांवर त्याला जाणवत होता. खालून समुद्राच्या लाटांच्या प्रचंड गर्जना ऐकू येत होत्या. तो घनगंभीर आवाज आणि तोंडावर, कानांवर आदळणारे जोराचे वारे येवढेच फक्त कोंडीबाला समजत होते. बघता बघता पक्षी झपाट्याने जमिनीवर उतरला. कोंडीबाला मात्र त्याने अलगद पाठीवरून खाली उतरवले. आणि मग तो त्याला म्हणाला.

" हं आता उघड बघू डोळे. आणि पाहा भोवती काय दिसते आहे ते ! "

कोंडीबाने आपले गच्च मिटलेले डोळे उघडले. बघतो तो काय ? जिकडे तिकडे नुसता लखलखाट, निळ्याभोर आभाळातून सूर्याचे झळझळीत ऊन खाली सांडत होते आणि त्या पिवळ्याधमक किरणात जमिनीवर सर्वत्र पसरलेले चांदीचे आणि सोन्याचे असंख्य तुकडे नुसते लखलख, लखलख करीत होते. ते अपार वैभव पाहून कोंडीबाचे डोळे तर अगदी दिपूनच गेले. काय बोलावे, काय करावे, त्याला काही सुचेना. तो वेड्यासारखा नुसता टकमक बघत राहिला.

पक्षी त्याला म्हणाला, " आहे ना भरपूर सोनं इथं ? आणि चांदी सुद्धा

आहे बघ. चल, उचल यातून तुला हवं तेवढं !"

कोंडीबा खाली वाकला आणि जमिनीवर पसरलेल्या त्या असंख्य तुकड्यां-मधून त्याने फक्त पाच सोन्याचे आणि पाच चांदीचे तुकडे उचलून घेतले. मग ते तुकडे त्याने आपल्या अंगरख्याच्या खिशात टाकले.

"काय? येवढंच चांदी-सोनं पुरे झालं तुला?" पक्ष्याने आश्चर्याने विचारले.

"हो. पुरे झालं." कोंडीबा म्हणाला.

"नक्की?"

"अगदी नक्की!"

"तू शहाणा माणूस आहेस." पक्षी म्हणाला, "माणसानं थोडंच मागावं. म्हणजे त्याला कधी कशाचं कमी पडत नाही. कधी कशाची गरज भासत नाही."

मग पक्ष्याने पुन्हा कोंडीबाला आपल्या पाठीवर घेतले आणि पंखांच्या भराऱ्या मारीत समुद्र ओलांडून त्याला त्याच्या शेतापाशी आणून सोडले.

सुवर्णदेशातून आणलेले मोजके चांदी-सोने कोंडीबाने बाजारात नेऊन विकले. त्याची त्याला चांगली किंमत आली. मग त्या पैशांतून त्याने आणखी शेत खरेदी केले. त्या शेतात तो भरपूर मेहनत करू लागला. लौकरच तो चांगला श्रीमंत झाला.

आता धोंडीबाला आपल्या धाकट्या भावाचा फार हेवा वाटू लागला. तो सारखा कोंडीबाला म्हणे, "तू बदमाष आहेस. तू नक्की कुठे तरी डल्ला मारला असशील. कोणाचे तरी डबोले लुटलं असशील, त्याशिवाय का असा एकाएकी कुणी श्रीमंत होतो? सांग. येवढा पैसा तुला कुठे मिळाला? कसा मिळाला? खरं बोल. नाहीतर बघ. माझ्याशी गाठ आहे!"

धोंडीबा सारखा सारखा असे टोचून, दरडावून बोलू लागला. तेव्हा एके दिवशी कोंडीबाने सर्व हकिगत त्याला सांगून टाकली. ती ऐकून धोंडीबाला फार नवल वाटले. त्याबरोबर त्याच्या मनात लोभही निर्माण झाला. तो घरी आला आणि त्याने ती सर्व हकिगत बायजाला सांगितली. मग तो तिला म्हणाला,

"काय ग? तुला काय वाटतं? आपणही असंच का करू नये?"

"त्यात काय मेलं मोठंसं अवघड आहे?" बायजा म्हणाली, "मी पुन्हा पायलीभर गहू शिजवते. एक बिन शिजवलेला गहू त्यांत राखून ठेवते. मग ते गहू तुम्ही शेतात पेरा अन् मग पाहू काय होतंय ते!"

झाले. नवराबायकोचा विचार ठरला. बायजाने सगळे पूर्वी केले होते तेच आणि तसेच केले. धोंडीबाने ते शिजवलेले गहू शेतात पेरले. धोंडीबाच्या शेतात एकच अंकुर रुजला. त्या रोपाला एक भली थोरली लोंबी लागली. आणि लोंबी पिकली तेव्हा तो प्रचंड पक्षी ती लोंबी नेण्यासाठी शेतात आला. लोंबी चोचीत धरून पक्षी आभाळात उडाला तेव्हा धोंडीबाने तसाच त्याचा पाठलाग केला. पूर्वीसारखेच त्या दोघांचे सारे संभाषण झाले. आणि कोंडीबा-प्रमाणेच धोंडीबालाही पक्ष्याने सुवर्णदेशात आणून सोडले.

"पण कोंडीबाप्रमाणे धोंडीबा अल्पसंतुष्ट नव्हता. त्याने सुवर्णदेशात सगळीकडे लखलखणारे चांदी-सोन्याचे तुकडे पाहिले, तेव्हा त्याच्या तोंडाला पाणी सुटले. त्याचे डोळे फिरले आणि त्या तुकड्यांतले किती घेऊ अन् किती नाही असे त्याला होऊन गेले. चांदी-सोन्याचे मोठाले तुकडे लहानशा टेकड्यां-एवढे होते. लहान तुकडे खडक, दगडी चिरे, विटा यांच्याएवढे होते आणि अगदी लहान लहान कण वाळूप्रमाणे तिथे सर्वत्र पसरले होते.

लोभाने धोंडीबा अगदी वेडा झाला. तो आधाश्यासारखे भराभर मोठे मोठे तुकडे गोळा करू लागला. ते छातीशी, पोटाशी कवटाळू लागला. आपल्याला हवे तेवढे खूप खूप चांदी-सोने बरोबर घेता येत नाही म्हणून कासावीस होऊन रडू लागला. बघता बघता केवढेतरी ओझे त्याने गोळा केले.

"आता पुरे." पक्षी म्हणाला, "माणसाला कोणत्याही गोष्टीचा फार लोभ असू नये, चल. मी तुला तुझ्या शेतावर नेऊन सोडतो."

पण धोंडीबाचे अजून समाधान झाले नव्हते. भोवती सर्वत्र पसरलेली ती अफाट संपत्ती जणू त्याला तिथून हलू देत नव्हती.

"नाही रे पाखरा, अजून जरा थांब ना रे थोडा वेळ!" धोंडीबा त्या पक्ष्याची विनवणी करू लागला, "अशी घाई नको रे करू! मला अजून थोडे तुकडे गोळा करू दे."

"बघ. तो सूर्य अस्ताला चालला आहे. त्या आधी आपल्याला इथून निघायला हवं." पक्षी म्हणाला, "या देशात रात्री विलक्षण थंडी पडते-

आम्ही इथेच राहणारे आहोत. आम्हांला ती थंडी बाधत नाही. पण तुम्हां माणसांना ती सहन व्हायची नाही. तू गारठून जाशील. चल चल. आटप लौकर !"

पक्षी इतके समजावून सांगत होता, पण धोंडीबाला काही त्या चांदी-सोन्याचा लोभ सुटेना. "आणखी थोडं ! आणखी थोडं !" म्हणून तो आपला ते चमचमते तुकडे वेचीतच राहिला. इतक्यात सूर्य डोंगराआड गेला. सूर्य मावळला मात्र. एकदम तिथे थंडीची अशी भयानक लाट आली की आपल्या अंगातून बर्फाची तलवार कुणी आरपार भोसकीत आहे असे धोंडीबाला वाटले. त्याचे सर्वांग हीव भरल्यामुळे कुडकुडू लागले. मग ते बधिर झाले. त्याचे नाक-तोंड कोरडे पडले. त्याला धड श्वास देखील घेता येईना. तो धाडकन कोसळून खाली जमिनीवर पडला. थोड्याच वेळात त्याचे प्राण त्याला सोडून गेले. त्याने गोळा केलेले चांदीसोन्याचे ते प्रचंड ढीग जिथल्या तिथेच पडून राहिले. ती सर्व संपत्ती पोरकी झाली.

पक्ष्याने एकवार धोंडीबाकडे नजर टाकली. खेदाने मान हलवली. आणि मग तो भर्रकन उडून आपल्या घरट्याकडे गेला.

बायजा इकडे आपल्या श्रीमंतीची स्वप्ने बघत होती. नवऱ्याची उत्सुकतेने प्रतीक्षा करीत होती. असे दिवसांमागून दिवस गेले. पण सुवर्णदेशातून सोने आणायला गेलेला धोंडीबा पुन्हा आपल्या घरी आला नाही. आलाच नाही.

# धनदत्त श्रेष्ठी

फार पूर्वीच्या काळी उज्जयिनी नगरात धनदत्त नावाचे श्रेष्ठी म्हणजे सावकार राहात होते. धनदत्त इतके श्रीमंत होते की सर्व देशभर त्यांच्या ऐश्वर्याची ख्याती पसरली होती. गावाच्या बाजारपेठेत धनदत्त श्रेष्ठींची भली थोरली पेढी होती. पेढीला लागूनच त्यांचा डौलदार सात चौकी सात मजली वाडा होता. गावाबाहेर त्यांच्या अतिशय सुंदर फुलबागा व फळबागा होत्या. त्यांच्या बागेतल्यासारखी फुले आणि फळे दुसरीकडे कुठे बघायलाही मिळत नसत. त्यांच्या बागांजवळून एक नदी वाहत असे. तिचे नाव होते क्षिप्रा. क्षिप्रा नदीतले मासे अतिशय रुचकर व चवदार असत. मधून मधून श्रेष्ठींच्या मुदपाकखान्यात ते मासे तळले जात आणि श्रेष्ठींना त्या दिवशी वेगळीच मेजवानी मिळे. एरव्ही पक्वान्ने, मिठाई, सुका मेवा, फळफळावळ यांना काही तोटाच नसे. धनदत्त श्रेष्ठींच्या भांडारात मूल्यवान रत्ने होती. चीन देशातून मागवलेली तलम रेशमी वस्त्रे होती. त्यांच्या घरात देशोदेशी मिळणाऱ्या चित्र-विचित्र आणि देखण्या वस्तू पाहायला मिळत. एकूण धनदत्त श्रेष्ठींइतका वैभवसंपन्न आणि दैववान माणूस साऱ्या उज्जयिनी नगरात शोधूनही सापडला नसता. या वैभवाला शोभा आणणारी सुशील पत्नी व दोन सुंदर गुणी मुलेही त्यांना होती. देव एखाद्याला देतो म्हणजे अगदी दोन्ही हातांनी भरभरून देतो! श्रेष्ठींना काय कमी होते?

तरीही धनदत्त श्रेष्ठी सुखी नव्हते. त्याचे कारण एकच. त्यांचा स्वभाव अतिशय लोभी होता. जो जो आपल्या व्यापारधंद्यात त्यांना धन मिळे तो तो त्यांचा लोभ, हव्यास अधिकाधिक वाढत जाई. आणखी, आणखी, आणखी. हेच जणू त्यांच्या आयुष्याचे सूत्र होते. दिवसभर एकच विचार त्यांना सतावीत असे. त्यांची पत्नी पल्लवी त्यांना म्हणे, " आपल्याला देवाच्या दयेनं काही सुद्धा कमी नाही. मग मी म्हणते, ही इतकी हाव कशापायी ? " पण श्रेष्ठींच्या मनावर तिच्या बोलण्याचा काही परिणाम होत नसे. त्यांना सारखे वाटे, माझी संपत्ती आणखी कशी वाढेल ? माझ्या दहा कोटी निष्क द्रव्याचे वीस कोटी कधी होतील ? आणि ही चिंता मन पोखरू लागली की धनदत्त श्रेष्ठी अगदी अस्वस्थ होऊन जात. मग रात्र रात्र त्यांना धड झोप सुद्धा लागत नसे.

एके दिवशी धनदत्त श्रेष्ठी आपल्या बागेमध्ये हिंडत होते. इतक्यात एका ठेंगण्याशा झाडाच्या फांदीवर एक चिमुकला पक्षी बसलेला त्यांनी पाहिला. तो पक्षी इतका गोजिरवाणा, सुंदर होता ! त्याचे मस्तक मखमलीसारखे निळेभोर होते. अंग तपकिरी रंगाचे असून त्यावर पिवळे पट्टे व ठिपके होते. त्याच्या शेपटीत तर इंद्रधनुष्याचे सातही रंग एकवटले होते. त्या पक्ष्याच्या डोकीवर जांभळ्या सोनेरी रंगाचा छोटासा तुरा होता. आणि त्याचे डोळे माणकांसारखे लालबुंद होते. पक्षी आपल्याशीच मजेने गात होता. त्याचे गाणेही शीळ घातल्यासारखे मंजुळ होते.

धनदत्त श्रेष्ठींना तो पक्षी अगदी मनापासून आवडला. त्याबरोबरच असा सुंदर आणि शिवाय सुरेल गाणारा पक्षी आपल्यापाशी असावा असा लोभही त्यांच्या मनात निर्माण झाला. ते स्वतःशीच विचार करू लागले, " हा सुंदर पक्षी मी पकडला तर आज ना उद्या तो कुणीतरी माझ्याकडून विकत घेईल. अशा दुर्मिळ पक्ष्याला किंमतदेखील भरपूर येईल. तर मग हा पक्षी मला पकडायला हवा ! "

धनदत्त श्रेष्ठी जसे लोभी होते तसेच ते फार धूर्तही होते. त्यांनी आपल्या नोकरांना सांगून बागेत एक रेशमाचे जाळे पसरून ठेवले. आणि दूर अंतरावर उभे राहून ते तो पक्षी जाळ्यात कधी सापडतो याची वाट बघत बसले. बिचाऱ्या पक्ष्याला या कपटकारस्थानाची काहीच कल्पना नव्हती. तो या झाडावरून त्या झाडावर उडत उडत मजेने खाली उतरला तो नेमका त्या रेशमी जाळ्यात



सापडला !

इतका सुंदर आणि दुर्मिळ पक्षी हाती आल्यावर धनदत्त श्रेष्ठींचा आनंद गगनात मावेना. त्यांनी तो पक्षी आपल्या वाड्यात न्यायचे ठरवले. पण पक्ष्याला हात लावला की तो फडफड करी. चीत्कार करी. केविलवाणा ओरडे. शेवटी श्रेष्ठींनी त्याला जाळ्यातून काढून अलगद आपल्या हातात धरला. पक्षी उदास आणि मलूल दिसत होता. धनदत्त श्रेष्ठी त्याला म्हणाले,

"अरे, इतका वेळ कसा मजेत गात होतास? आता का गाणं बंद झालं तुझं? गा. माझ्यासाठी शीळ घालून गोड गोड गाणं गा!"

एकाएकी एक चमत्कार घडला. धनदत्त श्रेष्ठींनी हातांत पकडलेला तो पक्षी एकदम मनुष्यवाणीने बोलू लागला. तो म्हणाला,

"माझ्या गाण्यासाठी तुम्ही मला पकडलंत म्हणायचं? पण तुम्हीच सांगा.

पकडलेला पक्षी कधी आनंदानं, मनमोकळेपणानं गाऊ शकेल का ?"

"मी तुला गायला भाग पाडीन." श्रेष्ठी म्हणाले.

"ते कसं शक्य आहे ?" पक्षी म्हणाला, "माझा तुम्ही छळ केलास तर मी अन्नपाणी वर्ज्य करून मरून जाईन. मग तर माझं गाणं तुम्हाला जन्मात ऐकायला मिळण्याची आशाच नको !"

पक्ष्याचे बोलणे ऐकून धनदत्त श्रेष्ठी चिडले. ते म्हणाले, "का रे पाखुर्ड्या ? फारशी बडबड लावली आहेस ? मी तुला एका क्षणात चिरडून टाकीन. आणि तुझं कोवळं लुसलुशीत मांस शिजवून त्यावर ताव मारीन !"

पक्षी आता हसू लागला. तो म्हणाला, "श्रेष्ठीजी, मला मारून काय होणार आहे ? येवढंसं माझं शरीर. माझ्या मांसाचे दोन घासदेखील पुरते मिळायचे नाहीत तुम्हाला. शिवाय गोड गाण्याऱ्या पक्ष्याचं मांस रुचकर असतंच असंही नाही. एकूण मला मारून तुमचं पोट भरणार नाही. तुम्हाला काही चवदार खाल्ल्याचा आनंदही मिळणार नाही. उलट एका गरीब बिचाऱ्या पाखराची हत्या केल्याचं पाप मात्र तुमच्या डोक्यावर बसेल. एका क्षुल्लक गोष्टीसाठी येवढ्या मोठ्या पापाचे धनी होणार का तुम्ही ? त्यापेक्षा मला आपले सोडून द्या ना ?"

पक्षी होता छोटासाच. पण तो बोलत मात्र होता पंडितासारखा. त्याच्या बोलण्याने धनदत्त श्रेष्ठींचा राग आणखीच भडकला. पण पक्ष्याशी त्यांना वादही घालता येईना. शेवटी ते चिडून त्याला म्हणाले,

"तू काय वाटेल ते म्हणालास तरी मी तुला मुळीच मोकळा सोडणार नाही. मी आता एक छानसा सोनेरी पिंजरा बनवणार अन् त्यात तुला ठेवून देणार. मग तू गा नाही तर नको गाऊ."

पक्षी म्हणाला, "माझं जरा ऐका श्रेष्ठीजी. तुम्ही जर मला सोडून दिलंत तर मी तुम्हाला तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगेन. आणि त्याप्रमाणे तुम्ही वागलात तर त्यापासून जन्मभर तुम्हाला अपरंपार फायदा होईल."

फायदा. लाभ. ते शब्द ऐकल्याबरोबर त्या लोभी धनदत्त श्रेष्ठींचे डोळे आनंदाने चमकले. त्यांच्या तोंडाला पाणी सुटले. ते त्या पक्ष्याला म्हणाले, "ठीक आहे. मी सोडून देतो तुला. पण तू त्या महत्त्वाच्या तीन गोष्टी मला सांगशील ना ? तू फसवणार नाहीस ना मला ?"

" श्रेष्ठीजी, असं काय बोलता ? मी तुम्हाला शपथपूर्वक सांगतो, मी खोटं बोलत नाही. मी तुम्हाला कधीच फसवणार नाही ! "

पक्ष्याचे ते शब्द ऐकून श्रेष्ठींचा निश्चय ठरला. त्यांनी त्याला सोडून दिले श्रेष्ठींच्या हातातून सुटल्याबरोबर पक्षी झाडाच्या एका उंच फांदीवर जाऊन बसला. त्याने आनंदाने आपले पंख फडफडावले. शीळ घातली. आणि मग तो चोचीने आपली विस्कटलेली पिसे साफसूफ करू लागला.

धनदत्त श्रेष्ठी त्या पक्ष्याकडे आशाळभूतपणे बघत होते. जरा वेळाने ते त्याला म्हणाले,

" अरे, तू त्या तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगणार होतास ना ? त्यांच्या योगानं मला आयुष्यात खूप फायदा होणार आहे ना ? तर मग सांग ना त्या तीन गोष्टी ! "

पक्षी खदखदा हसला. मग तो धनदत्त श्रेष्ठींना म्हणाला, "श्रेष्ठी, ऐका तर मग त्या तीन गोष्टी. पहिली गोष्ट. कुणीही तुम्हाला काहीही सांगेल, त्या साऱ्यांवर तुम्ही भोळसटपणाने विश्वास ठेवू नका ! "

पक्ष्याचे बोलणे ऐकून धनदत्त श्रेष्ठी इतके चिडले की त्यांनी बागेत जमिनीवरच बैठक मारली. डोकीवरचे पागोटे ओरबाडून काढून ते दूर फेकून दिले. आणि डोक्याचे केस तोडीत ते संतापाने लाल होऊन म्हणाले,

" भिकारड्या, यात तू मला नवं काय सांगितलंस ? हे तर मला आधीच ठाऊक होतं. "

" बरं. ठाऊक असेल. " पक्षी म्हणाला, " पण आता यापुढे ही गोष्ट नीट ध्यानात ठेवा म्हणजे झालं ! "

" तू माझी कुचेष्टा करतो आहेस. कळतंय मला, " श्रेष्ठी रागारागाने म्हणाले, " पुन्हा तर तू माझ्या तावडीत सापड, म्हणजे जन्मभर लक्षात राहील असा धडा मी तुला शिकवतो की नाही पाहा ! "

पक्षी हसत म्हणाला, " ते सोडा. आता मीच तुम्हाला दुसरा धडा शिकवतो. तो हा की आपल्या हाती जे कधी गवसलंच नव्हतं त्याच्याबद्दल केव्हाही दुःख, पस्तावा करू नका, त्याचा काही उपयोग नसतो. "

" अरे खोटारड्या, " श्रेष्ठी म्हणाले, " याचा अर्थ तू मला पुरतं बनवतो आहेस. कारण तू माझ्या हातात सापडला होतास आणि आता मात्र चक्क

म्हणतो आहेस, की जे तुमच्या हातात कधी गवसलंच नव्हतं त्याचा प्रस्ताव करू नका. याचा अर्थ काय ?"

पक्ष्याने श्रेष्ठींच्या बोलण्याकडे लक्षच दिले नाही. तो शांतपणे चोचीने आपली पिसे साफसूफ करीत राहिला.

धनदत्त श्रेष्ठी जरा वेळ त्याच्याकडे टक लावून बघत होते. मग ते त्याला म्हणाले,

"बरं. ते जाऊ दे. तू तिसरी एक महत्त्वाची गोष्ट मला सांगणार होतास. ती कोणती ?"

"आता अगदी लक्षपूर्वक ऐका हं !" पक्षी म्हणाला, "ही तिसरी गोष्ट जो ध्यानात ठेवील त्याला जन्मात कधी दारिद्र्य येणार नाही."

धनदत्त श्रेष्ठींनी उत्सुकतेने कान टवकारले. चित्त एकाग्र करून ते त्या पक्ष्याकडे टक लावून बघत राहिले.

"ऐका तर ती तिसरी गोष्ट." पक्षी म्हणाला, "जे तुमच्या हातांत असेल ते कधीही खाली पायांशी फेकून देऊ नका."

आता मात्र धनदत्त श्रेष्ठींना संतापाने वेड लागण्याची पाळी आली. ते म्हणाले,

"अरे धूर्त चोरा, कपट्या, मी तुझ्यावर प्रथम विश्वासच का ठेवला ? तू सांगितलेल्या गोष्टींमधली एकही गोष्ट मला नवीन नाही. हे सारं तर मला पहिल्यापासून माहीत होतं."

"मुळीच नाही. ही तिसरी गोष्ट तुम्हाला अजिबात ठाऊक नाही." पक्षी म्हणाला, "जे हातांत सापडलं आहे ते कधी सोडू नये हे जर तुम्हाला ठाऊक असतं तर तुम्ही मला कधी सोडूनच दिलं नसतं."

पक्षी दुष्टपणाने पुढे म्हणाला,

"आणखी हे बघा. असं म्हणतात की माझ्या पोटामध्ये लिंबाएवढं एक चिंतामणी रत्न आहे, त्याचं वजनच मुळी दहा तोळे आहे, हे रत्न ज्याच्या-पाशी असेल त्याला आयुष्यात कधी कसली कमतरता पडणार नाही. त्याला कधीही दारिद्र्य येणार नाही !"

आता मात्र धनदत्त श्रेष्ठींना आपले दुःख आवरेना. कपाळावर हात मारून घेत रडत रडत ते म्हणाले,

"अरेरे ! मी बुडालो. माझा सर्वनाश झाला. अतिशय मोलाचं चिंतामणी

रत्न माझ्या हाती आलं होतं, ते मी आपल्या अविचारीपणानं गमावून बसलो. देवा, देवा, आता मी काय करू!"

झाडावर बसलेला पक्षी धनदत्त श्रेष्ठींचा शोक अगदी शांतपणे बघत होता. जरा वेळाने तो म्हणाला,

" श्रेष्ठीजी, ते रडणं अन् बडबडणं आवरा. आणि माझ्या एका प्रश्नाचं आधी उत्तर द्या बरं."

श्रेष्ठींनी डोळे पुसून प्रश्नार्थक नजरेने पक्ष्याकडे नुसते पाहिले.

पक्षी कुत्सितपणे म्हणाला, "तुम्ही गावातले श्रीमंत सावकार, मोठे श्रेष्ठी. तुमच्या पेढीवर लाखो निष्कांची देवघेव होते. तुमच्या हातांतून रोज कितीतरी सोनें नाणं, हिरेमाणकं, मूल्यवान रत्नं जातात. मघाशी तुम्ही मला आपल्या हातांत पकडलं होतं. खरं सांगा. माझ्या पोटात जर दहा तोळे वजनाचं रत्न असतं तर मी तुम्हाला जड, वजनदार लागलो नसतो? तसं माझं वजन होतं का?"

श्रेष्ठी म्हणाले, "नाही. तुझं शरीर मला अगदी हलकंफूल लागलं."

"मग मी तुमची मस्करी करीत आहे, माझ्या पोटात रत्न वगैरे काही नाही येवढी साधी गोष्ट कळू नये तुम्हाला? याचाच अर्थ असा नव्हे का की, जे तुमच्या हाती कधी लागलंच नव्हतं, तुम्हाला कधी गवसलंच नव्हतं ते गमावल्याबद्दल तुम्ही शोक करीत बसला आहात. तुम्ही मूर्ख आहात श्रेष्ठीजी. मूर्ख आणि लोभी."

धनदत्त श्रेष्ठींची वाचाच बंद झाली. भकास चेहऱ्याने ते त्या पक्ष्याकडे पाहू लागले.

"आता शेवटची एक गोष्ट ऐकून घ्या!" पक्षी म्हणाला, "मी सामान्य पक्षी नाही. मी आहे तुमचं भाग्य, आणि आता मी इथून निघून जाणार आहे, कायमचा. तुमच्यासारख्या स्वार्थी, लोभी आणि निर्दय माणसापाशी राहण्याची मला मुळीच इच्छा नाही. आणि हे माझे बोलणे मात्र अगदी सत्य आहे असे समजा. येतो मी!"

बघता बघता पक्ष्याचे रूप पालटले. तेजाचा एक झगझगता लोळ झाडावर दिसू लागला. क्षणभराने तो अदृश्य होऊन गेला. धनदत्त श्रेष्ठी उदास चेहऱ्याने, शून्य नजरेने झाडाकडे बघत राहिले. ▣

# बनीचे गुपित

" खळ्ळ् ! " मोठ्याने आवाज झाला.

बनी दचकली. दिवाणखान्यातल्या सामानावर फडके मारणारा तिचा हात एकदम थांबला. फडके मारता मारता टेबलावरचे नाजूक पुष्पपात्र निसटून खाली पडले होते आणि त्याचा चक्काचूर झाला होता. खालच्या गालिच्यावर हिरव्या सोनेरी रंगाच्या काचेचे असंख्य तुकडे विखुरले होते. सकाळच्या कोवळ्या उन्हात त्या काचा चमचम करीत होत्या. डोळे मिचकावून बनीच्या वेंधळेपणाला त्या हसत होत्या जणू काही ! आणि पुष्पपात्रातली गुलाबाची टपोरी सुंदर फुले लांब जाऊन पडली होती. ती बिचारी हिरमुसून गेली होती !

बनीचे तोंड खर्रकन् उतरले. तिचे अंग लटलट कापू लागले. तिच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. खाली पडलेल्या काचांकडे ती टकमक पाहू लागली. ते पुष्पपात्र राणीसाहेबांचे फार आवडते पुष्पपात्र होते. गेल्या वर्षी राजेसाहेब परदेशी प्रवासाला गेले होते तेव्हा त्यांनी राणीसाहेबांसाठी ते मुद्दाम तिकडून विकत आणले होते. आणि त्याची किंमतही बरीच होती म्हणे ! राणीसाहेब त्या पुष्पपात्राला जिवापाड जपत असत ! आणि बनीने आता दिवाणखाना साफ करता करता त्याचा निकाल लावून टाकला होता.

बनी राजवाड्यात कामाला होती. पडेल ते काम तिला करावे लागे. राणीसाहेबांसाठी बागेतल्या जुईच्या कळ्या तोडण्यापासून तो धाकट्या बाळराजांना

खेळवण्यापर्यंत वेगवेगळ्या कामांत ती तरबेज झाली होती. मुदपाकखान्यांत स्वयंपाकीणबाईंच्या हाताखाली काम करण्यातही तिचा बराच वेळ जाई. आज सकाळी ती राजवाड्यातला खाजगी दिवाणखाना झाडून स्वच्छ करत होती. आणि टेबलावर फडके मारता-मारता तिच्या हातून ते पुष्पपात्र फुटले होते.

बनीने घाईघाईने आपले डोळे पुसले आणि खाली वाकून गालिच्यावर पडलेल्या काचा ती आपल्या परकरांत हळूहळू गोळा करू लागली. कोणी बघायच्या आत सर्व काचा गोळा करून त्या दूर फेकून देण्याचा तिचा विचार होता. म्हणजे मग तिचा गुन्हा कदाचित् उघडकीला आला नसता. पुष्पपात्र कुणीतरी चोरून नेले असेच राणीसाहेब समजल्या असत्या. आणि बनी आपो-आप शिक्षेतून सुटली असती.

बनी भराभर काचा वेचू लागली. इतक्यात पाठीमागे कुणाची तरी चाहूल तिच्या कानावर आली. बनी भयंकर घाबरली. अरे बापरे! राणीसाहेब स्वतःच आल्या वाटते! बनीचा हात जागच्या जागी भराभर काचा वेचू लागला.

"काय बने! काय चाललं आहे?" गडगडणाऱ्या आवाजात मागून कोणी तरी जोराने ओरडले.

अरे! हे तर मामासाहेब! बनीची भीती जास्तच वाढली. यापेक्षा राणी-साहेब स्वतः आल्या असत्या तरी बरे झाले असते! एकदम त्यांचे पाय धरून त्यांची क्षमा मागता आली असती! पण मामासाहेब आले होते. त्यांच्या नजरेला आपला हा अपराध पडला म्हणजे मग आपली धडगतच नाही म्हणायची! बनीच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले.

मामासाहेबांना राजवाड्यांतले सारे नोकर अतोनात भीत असत! मामा-साहेब होतेच मुळी तसे. ते राणीसाहेबांचे भाऊ होते. सख्खे नव्हेत बरे का! कुठले तरी फार लांबचे भाऊ. पण मामासाहेबांचा झोक मात्र और होता. त्यांच्या गलेलठ्ठ शरीरावर भारी रेशमी कपडे सळसळत असत. लठ्ठ बोटांत हिऱ्यांच्या अंगठ्या चमकत असत. अंगावरच्या अत्तराचा वास सदा घमघमत असे. आणि तोंड नेहमी विड्याने रंगलेले असे. मामासाहेब राजवाड्यात राहात. सकाळ संध्याकाळ पंचपक्वान्नांवर ताव मारत आणि उरलेल्या वेळात दुसरा काही उद्योग न करता राजवाडयातल्या नोकरांना सतावण्याचे कार्य ते करत. हे काम असेच का केले आणि ते काम तसेच का झाले अशी त्यांची भुणभुण

नोकरांच्या पाठीमागे सारखी चाललेली असायची! आणि प्रत्येक नोकराच्या चुगल्या ते राणीसाहेबांजवळ जाऊन सांगायचे. बनीवर तर मामासाहेबांचा फारच राग होता. कारण एकदा मुदपाकखान्यात सर्व नोकरांसमोर तिने मामासाहेबांची नक्कल करून दाखवल्याचे त्यांच्या कानावर आले होते, म्हणून तिचे कुठे काही केव्हा चुकते आणि राणीसाहेबांना तिचे नाव सांगून तिची खोड आपण केव्हा मोडतो असे त्यांना झाले होते. आणि बिचारी बनी आज बरोबर त्यांच्या तावडीत सापडली होती.

मामासाहेब बनीच्या समोर येऊन उभे राहिले. हातातली बारीक चमचमती छडी तिच्यासमोर नाचवत ते तिला म्हणाले, "बने, काय चाललंय? काय प्रकार आहे हा?"

"अं–काय–कुठे काय?" परकराचा ओचा दोन्ही पायांशी घट्ट धरत बनी अडखळत म्हणाली, "काही नाही मामासाहेब! काही नाही!"

"अग चोरटे! लबाडे! मला फसवतेस काय?" मामासाहेब ओरडून म्हणाले, "काय आहे त्या परकरात लपवलेलं पाहू? सोड ओचा खाली! सोड!"

बनीने मुकाट्याने परकराचा ओचा सोडला. त्याबरोबर त्यात गोळा केलेल्या काचा खळखळत खाली पडल्या! मामासाहेबांचे डोळे आश्चर्याने सताड उघडले आणि मग ते हर्षाने चमकू लागले.

"अग कार्टे!" ते एकदम ओरडले, "राणीसाहेबांचं आवडतं पुष्पपात्र फोडून टाकलंस काय? आणि वर म्हणते कशी 'क्याही न्याही–क्याही न्याही!' खोटारडी कुठली! दम धर! आता राणीसाहेबांच्या कानांवर हे सारं घालतो. आणि देतो तुझी हकालपट्टी करून! द्वाड पोरगी कुठली!"

"मामासाहेब!" बनी हात जोडून रडतरडत म्हणाली, "येवढा वेळ मला माफ करा, राणीसाहेबांना माझं नाव सांगू नका हो! माझ्या गरिबाच्या पोटावर पाय आणू नका! नका मामासाहेब, असं करू नका." ती चटकन् पुढे झाली आणि खाली वाकून तिने मामासाहेबांच्या पायांवर खरोखरच डोके ठेवले!

बनी आपल्याला शरण आलेली पाहून मामासाहेबांना पोटातून आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या. पण वरकरणी चेहरा गंभीर ठेवून ते म्हणाले, "बरं

बरं ! या खेपेला तुझ्या गुन्ह्याची आम्ही तुला माफी देतो. पण त्याबद्दली एक काम तुला करावं लागेल. आज जेवणं झाली की रात्री तू माझे पाय दाबायला ये. या राजवाड्यात हिंडून हिंडून पाय फार दुखतात बुवा ! तेवढे तू दाबून देशील तर मग आपण नाही तुझं नांव सांगणार राणीसाहेबांना ! काय, येशील ना ? "

मामासाहेबांचे पाय दाबण्याचे काम रोज कोणा ना कोणा तरी नोकराला करावे लागे. आज ती शिक्षा बनीच्या वाट्याला आली होती. बनीला मनातून भयंकर चीड आली. 'माझं अडलंय खेटर यांचे लठ्ठ पाय दाबायला ?' ती मनात चरफडत म्हणाली, वरून मात्र तिने काकुळतीला येऊन म्हटले, "मामासाहेब आज किनई, गावाबाहेर जत्रा भरली आहे ना, ती बघायला जायचंय मला. आजचा दिवस मला जाऊ द्या ना ! उद्या किनई, मी नक्की तुमचे पाय दाबून देईन. अगदी देवाशपथ ! "

"नाही नाही नाही !" मामासाहेब एकदम किंचाळले, "ते काही चालायचं नाही ! आज म्हणजे आजच पाय दाबले पाहिजेस तू ! आज रात्री तू पाय दाबायला आली नाहीस तर उद्या सकाळी राणीसाहेबांना तुझं नाव मी सांगून दिलंच म्हणून समज ! जातो मी आता. त्या कांचा भरून टाक आणि रात्री पाय दाबून द्यायला ये. जत्रा बित्रा कुछ काही नाही ! समजलीस ! "

हातातील छडी फिरवत फिरवत मामासाहेब दिवाणखान्यातून निघून गेले, बनी त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे रागारागाने बघत राहिली. मामासाहेब दूर गेले अशी खात्री पटताच ती चिडून म्हणाली, "दुष्ट राक्षस कुठला ! आमच्या अगदी हात धुऊन पाठीमागे लागतो ! राजेसाहेबांपेक्षा अन् राणीसाहेबांपेक्षा याचाच त्रास अधिक ! "

तोंडातल्या तोंडात मामासाहेबांना शिव्या देत बनी कांचा गोळा करू लागली.

दुपारचा वेळ बनीने कामात कसा तरी चालवला. पण संध्याकाळ होत चालली तसतशी तिच्या जिवाची तगमग होऊ लागली. तिला आज जत्रेला जायलाच हवे होते ! तिच्या शेजारची विठा दोन दिवसांपूर्वी जत्रेला जाऊन आली होती. तिने जत्रेतल्या किती गमती सांगितल्या होत्या. तेथे गोल गोल फिरणारे लाकडी घोडे होते म्हणे ! झालेच तर रहाटगाडगे होते ! बाण

मारायचे लाकडी चक्र होते. खायला तर नुसती चंगळ होती. पेढे, बर्फी, रेवड्या, बर्फाचे रंगीत गोळे, रंगीबेरंगी सरबते-काय काय तरी जत्रेत मिळत होते! विठाने जत्रेतून पुष्कळ वस्तू विकत आणल्या होत्या. साडी, बाहुल्या, फुगे किती तरी वस्तू होत्या त्या.

त्या वस्तूंच्या आठवणीने बनी अगदी बेचैन झाली. काय वाटेल ते झाले तरी आज रात्री जत्रा बघायला जायचेच असे तिने ठरवले! मग मामासाहेब काय करतील ते करोत!

अंधार पडला. बनी मुदपाकखान्याच्या मागल्या बाजूच्या दरवाजातून हळूच बाहेर आली आणि बागेतल्या एका अरुंद पायवाटेने ती झपाझप चालू लागली. राजवाड्याच्या मागल्या बाजूला माणसांची रहदारी नसे. तिथूनच निसटून जाण्याचा तिचा विचार होता.

मामासाहेब आपल्या खोलीच्या पुढल्या सज्जात उभे होते. त्यांची सहज खाली नजर वळली. तो एक लहानशी आकृती लपत छपत जाताना त्यांना दिसली. बनीला त्यांनी ताबडतोब ओळखले. "अरे!" ते चिडून म्हणाले, "या पोरटीनं फसवलं काय मला? जाऊ नको म्हणून सांगितलं तरी ही जत्रा बघायला चाललेली दिसते आहे! पण या मामासाहेबांना फसवणं इतकं सोपं नाही म्हणावं! आता तिच्या पाठीमागं जातो असाच अन् आणतो पकडून तिला ताबडतोब!"

मामासाहेब भराभर खाली आले. पण ते राजवाड्याभोवतालची बाग ओलांडून येतात तोवर बनी धूम ठोकून केव्हाच दिसेनाशी झाली होती. मामासाहेबांनी विचार केला आणि मग ते जत्रेच्या दिशेने चालू लागले. बनीला पकडायचा त्यांनी निर्धार केला होता.

जत्रेत दिव्यांचा लखलखाट झाला होता. माणसांचा गोंगाट सगळीकडे भरून राहिला होता. लोक हसत होते. बोलत होते. ओरडत होते. टाळ्या पिटत होते. रहाटगाडगी गरागरा फिरत होती. झोपाळे उंच चढत होते. लाकडी घोडे एकामागून गोल गोल धावत होते. घसरगुंडीच्या टोकावरून माणसे खाली सर्रकन येत होती. फुगे उडत होते. बाण सुटत होते. वाद्ये वाजत होती! वाहवा! मौजच मौज सर्वत्र दिसत होती.

मामासाहेबांच्या डोक्यात गर्रकन काही तरी फिरले. ते राजवाडा विसरले.

आपले साठ वर्षांचे वय, आपला दर्जा, मान सारे काही विसरले. त्यांना आपले बाळपण आठवले. मामासाहेब पुन्हा आठ वर्षांचे पोर बनले. त्यांनी आनंदाने किंकाळी फोडली आणि जत्रेच्या कोलाहलात ते जाऊन मिसळले.

त्या रात्री मामासाहेबांनी किती गमती केल्या असतील त्याला काही सुमारच नाही. ते घसरगुंडीवरून धबाधब खाली आदळले. लाकडी घोड्यांवरून आणि रहाटगाड्यांतून चक्कर येईतो गरागर फिरले, बाण मारण्याच्या चढाओढीत ते पाच वेळा पहिले आले आणि त्यांना पाच सुरेख बाहुल्या बक्षीस मिळाल्या. त्यांनी सरबताच्या दुकानात सरबताचे पेले झोकले. बर्फी, रेवड्या विकत घेऊन खाल्ल्या. बर्फाचे गोळेदेखील चोखले.

आता मामासाहेब थकून एका कोपऱ्यात उभे होते. त्यांचे पागोटे गळ्यात आले होते. केस विस्कटले होते. तोंडावर घामाचे थेंब उभे राहिले होते. एका काखेत पाच बाहुल्या त्यांनी दाबून धरल्या होत्या आणि दुसऱ्या हाताने ते बर्फाची कांडी चोखत होते. त्यांच्या अंगरख्याच्या एका खिशांतून पेढ्यांचा पुडा डोकावत होता. आणि पाचसहा मोठे रंगीबेरंगी फुगे त्यांच्या खांद्यावरून उडत होते.

"छान आहे नाही जत्रा ?" त्यांच्या शेजारून एकदम एक चिमुकला आवाज उमटला.

मामासाहेब दचकले. ते भानावर आले. त्यांनी मान वळवून पाहिले तो शेजारी बनी उभी होती. तिचेही केस विस्कटले होते. तोंडावर चिकट डाग पडले होते. गाल लाल झाले होते आणि डोळे हिऱ्यांसारखे चमकत होते !

मामासाहेबांना ब्रह्मांड आठवले ! आपला हा अवतार बनीने पाहिला. आता राजवाड्यांत सर्वांना ती हे सांगत सुटणार ! आपण जत्रेत कसा पोरकट-पणा केला ते सर्व नोकरचाकरांना कळणार ! ते आपल्याला हसणार. आपली टिंगल करणार ! यापुढे नोकरांवर आपले वजन राहणार नाही. ते आपल्याला भिणार नाहीत. आपण सांगितलेली कामे ऐकणार नाहीत. अरेरे ! हे काय झाले ? मामासाहेब घाबरले. त्यांच्या डोळ्यापुढे काजवे चमकू लागले. त्यांच्या तोंडाला कोरड पडली. बनी त्यांच्याकडे टक लावून बघत होती.

मामासाहेबांनी क्षणभर स्वतःशी विचार केला. आणि मग ते बनीला म्हणाले, "बने, या घे तुला बाहुल्या. हे फुगे पण घे. अन् हा पेढ्यांचा पुडा

सुद्धा घे पाहू पटदिशी!" त्यांनी भराभर सर्व वस्तू तिच्या हातांत कोंबल्या. बनीने त्या मुकाट्याने घेतल्या. मामासाहेबांनी तिच्याकडे क्षणभर निरखून पाहिले. आणि मग ते हळूच तिला म्हणाले, "मला वाटतं, ते पुष्पपात्र फुटल्याची गोष्ट मी काही राणीसाहेबांच्याजवळ बोलायचा नाही. काचेची वस्तू. ती फुटायचीच कधीतरी! नाही का?"

बनीने हसून मान हलविली.

"अन् हे बघ. बने," मामासाहेब हळूंच म्हणाले, "हे आजचं आपलं जत्रेचं तू कुणाजवळ बोलू नकोस बरं का! नाही ना बोलायचीस?"

"नाही! नक्की नाही बोलणार!" बनी चटकन म्हणाली.

मामासाहेबांनी तिचे डोके प्रेमाने कुरवाळले. आणि मग ती दोघेही मोठमोठ्याने हसत सुटली. जरा वेळाने बनी म्हणाली, "मामासाहेब, आपण रहाटगाडग्यात पुन्हा एकदा बसू या का?"

"हो. बसू या की!" मामासाहेब म्हणाले, "अन् त्या लाकडी घोड्यावरून सुद्धा परत एकदा फिरावंसं वाटतंय मला! चल!"

त्यांनी बनीचा हात आपल्या हाती धरला आणि ती दोघे पुन्हा जत्रेच्या कोलाहलात जाऊन मिसळली.

...मामासाहेबांचा स्वभाव दुसऱ्या दिवसापासून पार बदलला. बनीलाच काय, पण राजवाड्यातल्या कुणाही नोकराला ते त्रास देईनातसे झाले. त्यांच्या स्वभावात झालेल्या या बदलाचे रहस्य मात्र बनीखेरीज दुसऱ्या कुणालाही अद्याप कळलेले नाही!

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
2922
विषय

BVBK-0402522